cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४० | रविवार दि.२८ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### वेड्यात काढण्याचे धंदे सुरु...

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीसाठीच्या वातावरणाने वेग घेतला आहे. इच्छुक उमेदवारांचा जनसंपर्क सुरू आहे. वेगवेगळ्या पक्षांच्या युती आणि आघाड्यांचे चित्र स्पष्ट झाले की प्रचारातही हळूहळू रंग भरू लागतील. मतदारांना भ्रमित करणारे प्रकार आणि बोलीभाषेत वेड्यात काढायचे धंदे मात्र सुरु झाले आहेत. व्हिडिओ लावणे, बूट पॉलिश करणे, मराठी माणसाच्या अस्मितेचा गजर करणे हे त्यापैकी काही.

# कापूस नोंदणी चार दिवसाने संपणार ; शेतकरी चिंतेत

## शेतकरी हमी भावाने कापूस विक्रीपासून वंचित राहण्याची भीती

पुणे । प्रतिनिधी

**खुल्या बाजारात कापसाचे दर कोसळल्याने शेतकरी हमीभावासाठी सीसीआयकडे धाव घेत आहेत. मात्र कापूस विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणीची अंतिम मुदत ३१ डिसेंबर असल्याने आणि ऑफलाइन पेरा नोंद प्रक्रिया उशिरा पूर्ण होणार असल्याने लाखो शेतकरी हमी केंद्रातील कापूस विक्रीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. जाचक अटी व तांत्रिक अडचणींमुळे हा निर्णय शेतकऱ्यांसाठी नवे संकट ठरत आहे.**



खुल्या बाजारात कापसाचे दर मोठ्या प्रमाणात घसरल्याने शेतकऱ्यांनी हमीभावासाठी कापूस खरेदी केंद्रांकडे धाव घेतली आहे. मात्र, कापूस विक्रीसाठी लादण्यात आलेल्या जाचक अटी आणि तांत्रिक अडचणींमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना अद्याप कापूस विक्रीसाठी नोंदणीच करता आलेली नाही. अशातच सीसीआयने ३१ डिसेंबरपर्यंतच कापूस विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी करण्याचे आदेश दिल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली

▶▶ पान २ वर


### ऑनलाइन अट शेतकऱ्यांसाठी अडथळा

ज्या शेतकऱ्यांची ऑनलाइन पीक पेरा नोंद नाही, त्यांना थेट सीसीआयच्या हमी केंद्रावर कापूस विक्री करता येत नाही. या गंभीर प्रश्नावर विधानसभेत महसूल मंत्र्यांकडे तारांकित प्रश्न उपस्थित करून कापूस व सोयाबीन विक्रीसाठी ऑफलाइन पर्याय देण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात केंद्र शासनाने कापूस व सोयाबीन विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी बंधनकारकच ठेवली असून त्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर अशी निश्चित करण्यात आली आहे.

### ऑफलाइन प्रक्रिया वेळ खाणारी

ऑनलाइन पेरा नोंद न झालेल्या शेतकऱ्यांसाठी ऑफलाइन प्रक्रियेचा पर्याय जाहीर करण्यात आला आहे. मात्र या प्रक्रियेनुसार शेतकऱ्यांना २४ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करायचे आहेत, तर जिल्हाधिकाऱ्यांकडून १५ जानेवारीला अंतिम अहवाल सादर केला जाणार आहे. तोपर्यंत कापूस विक्रीसाठीची ऑनलाइन नोंदणीची मुदत संपलेली असेल. त्यामुळे ऑफलाइन पद्धतीने नोंद करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रत्यक्षात हमी केंद्रावर कापूस विक्री करता येणार नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

# काँग्रेसचे ५ जानेवारीपासून 'मनरेगा बचाओ' अभियान



दिल्ली । वृत्तसंस्था

मनरेगा कायद्यातील बदलामुळे राजकीय संघर्ष तीव्र होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. काँग्रेसने ५ जानेवारीपासून 'मनरेगा बचाओ' आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला असून, या मुद्द्यावर रस्त्यावर तसेच संसदेत संघर्ष केला जाईल, अशी घोषणा काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी शनिवारी (दि.२७) केली. केंद्र सरकारने मंजूर केलेल्या 'विकसित भारत– रोजगार आणि अजीविका मिशन ग्रामीण कायदा' विरोधात काँग्रेस तीव्र आंदोलन करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

▶▶ पान २ वर

### राहुल गांधींचा पंतप्रधानांवर निशाणा

राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर तीव्र टीका करताना सांगितले की, व्हीबी–जी राम जी कायद्याविरोधात काँग्रेससह संपूर्ण विरोधी पक्ष एकत्र येऊन लढा देईल. हा कायदा राज्ये आणि गरिबांसाठी मोठा धक्का असून, नोटाबंदीप्रमाणेच कोणताही सखोल अभ्यास न करता एकतर्फीपणे तो लागू करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. मनरेगा हा केवळ रोजगार कार्यक्रम नव्हता, तर जगभरात प्रशंसित अशी विकासाची चौकट होती, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अचानक बिघडली

## गॅलक्सी रुग्णालयात दाखल

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या लढ्यात सातत्याने सक्रिय असलेले नेते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती अचानक खालावल्याने त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील गॅलक्सी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून सततचे दौरे, सभा यामुळे त्यांच्या शरीरावर मोठा ताण आला होता. आज तीव्र ताप येत असल्याने तातडीने वैद्यकीय मदत घेण्याची गरज भासली.



रुग्णालय प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, डॉक्टरांची विशेष टीम त्यांच्यावर उपचार करत असून, सध्या प्रकृती स्थिर आहे. डॉक्टरांनी पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला असून, कोणालाही भेटण्याची परवानगी नाकारण्यात आली आहे. रुग्णालयाबाहेर मराठा समाजाचे समर्थक आणि बांधवांनी मोठी गर्दी केली होती. यापूर्वीही उपोषण आणि आंदोलनांदरम्यान जरांगे पाटील यांची प्रकृती अनेकदा बिघडली होती, आणि ते गॅलक्सी रुग्णालयातच उपचार घेत होते. सध्या महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत असतानाच ही बातमी समोर आली आहे.

# दोन कुटूंबातील पितापुत्राचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

अणदूर । प्रतिनिधी

**तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथे शेतातील विहिरीतून पाईप काढण्याचे काम सुरू असताना विजेचा धक्का बसून दोन कुटुंबातील पितापुत्रांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना शनिवारी (दि. २७) दुपारी घडली. या घटनेने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, केशेगाव (ता. तुळजापूर) शिवारातील गणपती शिवलिंग साखरे यांच्या शेतात विहिरीतील मोटार कप्पीच्या साह्याने बाहेर काढली जात होती. यावेळी कप्पीचा तोल गेल्याने जवळून जाणाऱ्या ११ केव्ही उच्चदाब विद्युत तारेस कप्पीचा वरचा भाग लागला. काही क्षणातच मोठा विद्युत प्रवाह शरीरातून गेल्याने चौघांचा जागीच मृत्यू झाला. या भीषण दुर्घटनेत नागनाथ काशिनाथ साखरे (वय ५६) व त्यांचा मुलगा रामलिंग नागनाथ साखरे (वय २५), तसेच काशीम कोंडीबा फुलारी (वय ५४) व त्यांचा मुलगा रतन काशीम फुलारी (वय १७) यांचा मृत्यू झाला आहे. वडील – मुलगा

▶▶ पान २ वर

# नव्या वर्षात झेडपीचा धुरळा?

## दोन टप्प्यात होणार निवडणूका, संभाव्य वेळापत्रक समोर

मुंबई । प्रतिनिधी

येत्या नवीन वर्षात राज्याच्या ग्रामीण राजकारणाचा धुरळा उडणार असून 'मिनी मंत्रालय' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे. राज्यातील प्रलंबित ३२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका दोन टप्प्यात घेतल्या जाणार असून, पहिल्या टप्प्यात १२ जिल्हा परिषदांचा निवडणूक कार्यक्रम पार पडणार आहे. आरक्षणाच्या तांत्रिक तिढ्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने ही निवडणूक दोन टप्प्यात घेण्याचे नियोजन केले असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पहिल्या टप्प्यात राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि

▶▶ पान २ वर

### जि.प.निवडणुकीचा संभाव्य कार्यक्रम

निवडणूक आयोगाच्या नियोजनानुसार, ६ ते ८ जानेवारी दरम्यान निवडणुकीची अधिकृत घोषणा होऊ शकते. त्यानंतर १० ते १७ जानेवारी या कालावधीत उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया चालेल. १८ ते २० जानेवारी दरम्यान अर्जांची छाननी आणि उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत असेल. २१ जानेवारी रोजी उमेदवारांना चिन्हांचे वाटप केले जाईल. या प्रक्रियेनंतर ३० जानेवारी रोजी प्रत्यक्ष मतदान आणि ३१ जानेवारी रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.

# संचमान्यतेसाठी वीस ऑक्टोबरपर्यंतची विद्यार्थिसंख्या ग्राह्य

## शिक्षण विभागाचा निर्णय

पुणे। प्रतिनिधी

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी राज्यातील शाळांच्या संचमान्यतेबाबत शालेय शिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार २० ऑक्टोबरपर्यंत युडायस प्लस प्रणालीवर नोंद असलेले विद्यार्थी विचारात घेऊन त्यापैकी संचमान्यता करण्याच्या दिवसापर्यंतची आधार वैध विद्यार्थिसंख्या संचमान्यता निर्धारणासाठी विचारात घेतली जाणार आहे. शिक्षण विभागाने याबाबत प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत.

संचमान्यतेसाठी ३० सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. परंतु, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ च्या संचमान्यतेबाबत युडायस प्लस प्रणालीवर नोंद असलेली विद्यार्थिसंख्या, आधार वैध विद्यार्थिसंख्या

▶▶ पान २ वर

# भाजपला रावण राज आणायचे आहे!

## कुंभसाठी वृक्षतोडीवरून आदित्य ठाकरे आक्रमक

नाशिक । प्रतिनिधी

नाशिकमध्ये २०२७ च्या कुंभमेळ्यासाठी झाडे तोडण्याच्या प्रस्तावित योजनेवरून भाजपवर हल्ला चढवत, सत्ताधारी पक्षाला शहरात रावण राज आणायचे आहे, असे ठाकरेसेना पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. नाशिक महानगरपालिके निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येथे पक्षाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत होते.

नाशिक महानगरपालिकेने साधूग्राम

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### विहिंप, बजरंग दलाचे जोडे–मारो आंदोलन

परभणी : बांगलादेशातील हिंसाचाराच्या विरोधात परभणीतील हिंदू समाज बांधवांनी शनिवार, दि.२७ रोजी एकत्र येऊन बांगलादेशातील हिंसाचाराचा निषेध नोंदवित जोडे–मारो आंदोलन केले. छ. शिवाजी महाराज यांच्या पुतळा परीसरातील उपोषण मैदानावर झालेल्या या आंदोलनात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल शाखा परभणीच्या बांगलादेश मुर्दाबादच्या घोषणा देण्यात आल्या. यावेळी विहिंपचे क्षेत्र मंत्री अनंत पांडे म्हणाले की, बांगलादेशात हिंदूवर होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ व तेथील हिंदूंच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी संपूर्ण भारत देशात विहिंप व बजरंग दलाच्या वतीने निदर्शने आंदोलन करण्यात येत आहे.

### ८ वा वेतन आयोग १ जानेवारीपासून लागू होणार?

दिल्ली:केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी ८ व्या वेतन आयोगाची प्रतीक्षा आता संपताना दिसत आहे. तसेच जर सरकारने फिटमेंट फॅक्टर २.१५ निश्चित केला, तर कर्मचाऱ्यांचा मूळ पगार थेट दुप्पट होऊ शकतो. १ जानेवारी २०२६ पासून हा बदल लागू होण्याची शक्यता आहे. ज्या कर्मचाऱ्यांचा सध्याचा किमान मूळ पगार १८ हजार रुपये आहे, तो २.१५ च्या पटीत वाढून ३८,७०० रुपये होईल. तसेच, ५० हजार रुपये मूळ पगार असणाऱ्यांचा पगार १,०७,५०० रुपयांवर पोहोचेल. या वाढीमुळे केवळ पगारच नाही, तर महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि पेन्शनमध्येही मोठी वाढ होणार आहे. अद्याप अधिकृत घोषणा बाकी असली, तरी या संभाव्य निर्णयामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### अभिनेता अल्लू अर्जुनसह २३ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल

हैदराबादः दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २' चित्रपटाच्या प्रीमियरदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. या घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला होता, तर तिचा मुलगा गंभीर जखमी झाला होता. हैदराबादमधील संध्या थिएटरमध्ये ४ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या या घटनेत अल्लू अर्जुनसह थिएटर मालक आणि सुरक्षारक्षकांवर निष्काळजीपणाचा ठपका ठेवण्यात आला आहे. पोलिसांनी परवानगी नाकारलेली असतानाही अभिनेता तेथे पोहोचल्याने गर्दी अनियंत्रित झाल्याचा आरोप आहे. तसेच, खासगी बाउन्सरच्या वर्तणुकीमुळे गोंधळ वाढल्याचे तपासात समोर आले आहे. याप्रकरणी विविध कलमान्वये गुन्हे नोंदवण्यात आले असून, या कारवाईमुळे चित्रपटसृष्टीत मोठी खळबळ उडाली आहे.

### कबुतरांना दाणे घालणाऱ्यास ठोठावली दंडाची शिक्षा

मुंबई : कबुतरांना सार्वजनिक ठिकाणी खाद्य घालण्यास उच्च न्यायालयाने घातलेल्या बंदी आदेशाचे उल्लंघन केल्याने दादर येथील नितीन शेठ या ५२ वर्षीय व्यावसायिकाला वांद्रे येथील महानगर न्यायालयाने दोषी ठरवत पाच हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे. या प्रकरणात ही पहिलीच शिक्षा आहे. कबुतरखाना आणि कबुतरांना सार्वजनिक ठिकाणी खायला घालण्याचा मुद्दा मुंबईमध्ये मागील काही महिन्यांपासून चांगलाच चर्चेत आला होता. मुंबई उच्च न्यायालयाने जुलैमध्ये कबुतरांना खायला देण्यास बंदी घातली. मात्र अनेक ठिकाणी या आदेशाचे उल्लंघन होत आहे. हिंदुजा रुग्णालयाजवळील एलजे रोडवरील कबुतरखान्याजवळ नितीन शेठ या व्यापाऱ्याने कबुतरांना खायला दिल्याबद्दल माहीम पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# पालिका निवडणुकीत मशालीची ज्योत अन् तुतारीची धून मंदावली

मुंबई/ बीड । प्रतिनिधी

**राज्यामध्ये नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीमध्ये महायुतीला सर्वाधिक जागा मिळाल्या त्यासोबतच सर्वाधिक नगरसेवक महायुतीचे विजयी झाले. मात्र त्या तुलनेत काँग्रेस संख्याबळाने अधिक असल्याने शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या तुतारीची धून आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या मशालीचा ज्योत मात्र पालिका निवडणूकीत मंदावल्याचे दिसून आले.**

राज्यामध्ये नुकत्याच झालेल्या नगरपालिका आणि नगरपंचायत या निवडणुका आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांची रंगीत तालीम असते. तर जिल्हा परिषद, पंचायत समिती आगामी विधानसभा निवडणुकीची रंगीत तालीम समजली जाते. जिल्हा परिषद – पंचायत समिती पूर्वी झालेल्या राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत या निवडणुकीमध्ये भाजपाचे सर्वाधिक १२९ नगराध्यक्ष निवडून आले. त्या पाठोपाठ शिवसेना एकनाथ शिंदे यांचे ५१ तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ३५ नगराध्यक्ष झाले. त्या तुलनेत काँग्रेसने देखील ३५ जागेवर आपले नगराध्यक्षपदी उमेदवार निवडून आणले. मात्र शिवसेना उबाठाचे नऊ आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे सात ठिकाणी नगराध्यक्ष झाले. इतर २२ ठिकाणी अपक्ष नगराध्यक्ष निवडून आले. विशेषतः महायुती आणि महाविकास आघाडी अशी बऱ्याच ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत झाली त्यामुळे प्रत्येक पक्षाने आपली ताकद या निवडणुकीत अजमावली. त्यामध्ये भाजपा हा सर्वाधिक मोठा पक्ष बनला गेला. त्यातही महायुती असल्याने जवळपास ४४२२ नगरसेवक महायुतीचे निवडून आले. त्यामध्ये भाजपाचे २४३१, शिवसेना शिंदे गट १०२५, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट ९६६, काँग्रेस ८२४, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे २४४ तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे २५६ नगरसेवक राज्यात निवडून आले. मराठवाड्याची परिस्थिती पाहिली तर मराठवाड्यातील आठ जिल्हे, ४८ नगरपरिषद आणि ११ नगरपंचायतमध्ये नगराध्यक्ष, नगरसेवकासाठी निवडणूक झाली. मराठवाड्यातील बीड, छत्रपती संभाजी नगर, जालना, नांदेड, हिंगोली,

▶▶ पान २ वर

### राज्यातील पक्षीय नगराध्यक्ष

भाजप १२९, शिवसेना शिंदे ५१, राष्ट्रवादी अजित पवार ३५, काँग्रेस ३५, शिवसेना ठाकरे ९, राष्ट्रवादी शरद पवार ७ आणि इतर २२ असे राज्यातील पक्षाच्या नगराध्यक्षांचे बलाबल आहे.

### राज्यातील पक्षीय नगरसेवक

भाजपा २४३१, शिवसेना शिंदे १०२५, राष्ट्रवादी अजित पवार ९६६, काँग्रेस ८२४, शिवसेना ठाकरे २४४, राष्ट्रवादी शरद पवार २५६, असे नगरसेवक निवडून आले.

### मराठवाड्यातील पक्षीय नगरसेवक

भाजप ३५५, राष्ट्रवादी अजित पवार ३०१, शिवसेना शिंदे गट १४७, काँग्रेस १४७, शिवसेना ठाकरे ५४, राष्ट्रवादी शरद पवार गट ५९, असे मराठवाड्यातील नगरसेवकांचे पक्षीय बलाबल आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४४.०० क्विंटल | २,२९१ | ३,०९२ | २,५२८ |
| ज्वारी/हायब्रिड : ७८.५० क्विंटल | १,६५० | ३,९४१ | ३,१७४ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ३.०० क्विंटल | ६,२०१ | ६,७५१ | ६,४७६ |
| उडीद : १५.०० क्विंटल | ५,६१० | ६,०७० | ५,८७० |
| बाजरी: १३.०० क्विंटल | २,२०१ | ३,१६५ | २,८०३ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,३०१ | ६,३०१ | ६,३०१ |
| सोयाबीन: ६१६.०० क्विंटल | ४,००० | ४,७२५ | ४,६३३ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

## अग्रलेख

# वेड्यात काढण्याचे धंदे सुरू...

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीसाठीच्या वातावरणाने वेग घेतला आहे. इच्छुक उमेदवारांचा जनसंपर्क सुरू आहे. वेगवेगळ्या पक्षांच्या युती आणि आघाड्यांचे चित्र स्पष्ट झाले की प्रचारातही हळूहळू रंग भरू लागतील. मतदारांना भ्रमित करणारे प्रकार आणि बोलीभाषेत वेड्यात काढायचे धंदे मात्र सुरू झाले आहेत. व्हिडिओ लावणे, बूट पॉलिश करणे, मराठी माणसाच्या अस्मितेचा गजर करणे हे त्यापैकी काही. भेदाभेदांवरून फूट पाडणे हा तर सगळ्याच पक्षांचा आवडता मुद्दा आहे. एकमेकांचे व्हिडिओ प्रसारित करणे सुरू झाले आहे. पण मुद्दा समस्यांचा असो अथवा भेदाभेदांचा, सगळ्याच पक्षांचे पाय चिखलाने बरबटलेले आढळतात. सगळ्यांचे खायचे आणि दाखवायचे वेगळे आढळतात.

कालपर्यंत कट्टर शत्रुत्व असलेले आणि तेच कार्यकर्त्यांच्या मनातदेखील भरवणारे नेते आणि त्यांचे पक्ष आज मांडीला मांडी लावून निवडणूक लढवायला तयार होतात. प्रेमात सगळे क्षम्य असते ही युवा पिढीत प्रसिद्ध असलेली म्हण राजकारणी त्यांच्या सोयीने वापरतात. राजकारणात सगळे चालते, असे म्हणत बिनदिक्कतपणे असत्य वर्तन रेटून नेतात. राजकारणात संवाद संपवायचा नसतो असे म्हणतात, पण पाच वर्षे मतदारांशी संवाद संपतो त्याचे काय? निवडणुकीच्या काळात मतदारांच्या उंबरठ्याची माती कमी करणारे निवडून आल्यावर त्यांच्याकडे ढुंकूनदेखील बघत नाहीत त्याचे काय? परिसराचा, वॉर्डाचा नियोजनबद्ध विकास करायचा असतो हे त्यांच्या गावीही नसते. ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक, आमदार आणि खासदार यांची कर्तव्ये आणि जबाबदार्‍या किती लोकप्रतिनिधी सांगू शकतील? कारण अभ्यासू व्यक्तींना तिकीट देण्याची परंपरा कधीच खंडित केली गेली आहे. आता निवडून येणे हा एकच प्रमुख निकष पक्ष लावतात. ज्याच्याकडे ते सगळे बळ असते तेच निवडून येतात. मग आडात नसले तर पोहर्‍यात तरी येणार कसे? असा हा सर्वांचा जांगडगुत्ता आहे. ज्यात मतदार दर निवडणुकीला भोवंडून जातात आणि मतदान करून मोकळे होतात. मिळून सगळ्या पक्षांना फक्त सत्तेचे गणित जुळवण्यात रस असतो. सत्तेसाठीच राजकारण केले जाते हे समजण्याइतके मतदार सुज्ञ नक्की आहेत, पण राजकीय पक्ष दुसरा पर्यायच ठेवत नाहीत हेही वास्तवच. उमेदवार अजूनही उद्याने, गटारी बांधणे, सामाजिक सभागृहे बांधणे, सुरळीत आणि शुद्ध पाणीपुरवठा करणे अशी त्याच त्याच गोष्टींची गाजरे लोकांना दाखवत आहेत. म्हणजेच वर्षानुवर्षे त्या समस्या तशाच आहेत. पूर्णपणे सुटलेल्या नाहीत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माध्यमांनी सामान्य माणसांची मते जाणून घ्यायला सुरुवात केली आहे. त्यात याचेच प्रतिबिंब उमटते. कारण लोकांच्या मूलभूत गरजादेखील पूर्ण झालेल्या नाहीत. त्यामुळे त्याच त्याच मागण्या करणे हा त्यांचाही नाईलाज असतो. त्यामुळे उद्याने-गटारी बांधणे, पाणीपुरवठ्याची सोय करणे हेच फक्त नगरसेवकांचे कर्तव्य असते असाच समज रुजला आहे आणि तो तसाच ठेवण्यात पक्षांनाही रस असतो. कोणतीही गोष्ट निर्माण केली की तिची देखभालदेखील करावी लागते. एकदा उद्याने किंवा सभागृहे बांधली की नगरसेवक त्याकडे ढुंकूनदेखील बघत नाहीत. मग ती पडिक झाली नाही तरच नवल. त्यामुळे वर्षानुवर्षे तीच तीच आश्वासने दिली जातात. अर्थात, देखभाल केली तर दुकाने बंद होण्याची भीती वाटत असू शकेल का, हाही दखलपात्र मुद्दा आहे. तेव्हा आता मतदारांनीच शहाणे होण्याची गरज आहे. मतदारांनीच काही प्रश्न उमेदवारांना विचारायला सुरुवात करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, अधिकृत प्रचारासाठी दाराशी आलेल्या उमेदवारांना सुजाण नागरिक ‘मानव विकास निर्देशांक’ माहित आहे का असा प्रश्न नक्की विचारू शकतील. तो माहित असणार्‍या उमेदवारांची संख्या हाताच्या बोटावर मोजावी इतकी सुद्धा निघेल की नाही हे कदाचित पक्षांचे नेते देखील सांगू शकणार नाहीत.

किंबहुना देशाचा, राज्याचा असा काही निर्देशांक असतो आणि त्यात जनहिताच्या असंख्य मुद्यांचा समावेश असतो हेच अनेकांच्या गावी नसू शकेल. आयुष्यमर्यादा, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्याच्या सोयी, रोजगारांची उपलब्धता, सामाजिक भान, अनेक बाबतीतील विषमता, सामाजिक समता आणि समानता या त्यापैकी काही गोष्टी. ज्यांची सुरुवात वॉर्डातून देखील केली जाऊ शकेल. अनेक सुजाण आणि चिंतनशील नागरिक ते जाणून असतील; पण त्यांचा समावेश उमेदवारांमध्ये क्वचितच आढळू शकेल. हीच शोकांतिका आहे.

# चोर्‍या थांबण्यासाठी वडीरामसगांव गावात सीसीटीव्ही कॅमेरे लावले



**घनसावंगी । अंकुश सोनवणे**

घनसावंगी तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय वडील रामसगाव येथे इथे या गावात चोरट्यांना आळा घालण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसण्यात आली सदरील सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उद्घाटन तीर्थपुरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पठाडे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी ग्रामपंचायतच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पठाडे मॅडम यांचा सत्कार करण्यात आला. दिनांक २६ डिसेंबर रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले त्यावेळी ग्रामसभेचे अध्यक्ष श्री दत्तात्रेय कुंडलीक वराडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले . सदर ग्रामसभेसाठी पीटीओ श्री वैभव हर्षे विशेष उपस्थित होते. सदर ग्रामसभेत विकसित भारत जी रामजी अधिनियम २०२५ संदर्भात ग्रामपंचायत अधिकारी श्री के टी सोनमाळी यांनी अधिनियमातील ततुदींचे सविस्तर वाचन केले याप्रसंगी ग्राम रोजगार सेवक विलास जाधव ग्रामपंचायत माजी सरपंच महादेव जाधव ग्रामपंचायत ऑपरेटर मारुती सावंत ग्रामपंचायत कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

त्यानंतर ग्रामपंचायतीने लोक वर्गणीतून गावात बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे तीर्थपुरी पोलीस ठाण्याचे पी एस आय श्रीमती पठाडे मॅडम यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले याप्रसंगी ग्रामपंचायतचे सरपंच उपसरपंच सर्व सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने हजर होते. गावात ग्रामपंचायती मार्फत लोक वर्गणी जमा करून रुपये २४००० किमतीचे चार सीसीटीव्ही बसवण्यात आले आहे त्यामुळे गावात अवैधरित्या चालणाऱ्या धंद्यांना आळा बसेल. याबाबत ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# आज भाजपाच्या बीड जि. प.पं. स इच्छुकांच्या मुलाखती-पाटील,डोईफोडे, रसाळ

**बीड । प्रतिनिधी**

**तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती करिता इच्छुकांच्या मुलाखती २८/ १२/ २०२५ रोजी के एस के कॉलेज माने कॉम्प्लेक्स बीड येथे होणार आहेत.**







ना. मंत्री पंकजाताई साहेब मुंडे व माजी खासदार डॉ. प्रीतमताई साहेब मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड भाजपच्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका पार पडणार आहेत या मुलाखती निरीक्षकांच्या उपस्थितीत रविवार रोजी निरीक्षक म्हणून जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख, अक्षयभैय्या मुंदडा,माधव निर्मळ,सतीशजी मुंडे,संजय आंधळे या मान्यवर निरीक्षकांच्या उपस्थित होणार आहे यावेळी युवा नेते डॉ.योगेश शिरसागर, एडवोकेट सर्जेरावजी तांदळे हेही उपस्थित असणार आहे तरी बीड तालुक्यातील भाजप कार्यकर्ते यांनी ठीक दहा वाजता के एस के कॉलेज बीड येथे आपला इच्छुकांचा फॉर्म भरून उपस्थित राहण्याचे आवाहन बीड तालुक्याचे मंडळाध्यक्ष मनोज पाटील,राणा डोईफोडे अशोक रसाळ यांनी केले आहे.

# बीडच्या हक्काचा जनकल्याण महामार्ग हिरावून घेऊ नका-जोशी

**पाटोदा। प्रतिनिधी**

**राज्यातील महत्त्वाकांक्षी लातूर-कल्याण जनकल्याण द्रुतगती महामार्ग हा बीड जिल्ह्याच्या विकासाचा कणा ठरणारा असून, राजकीय दबावापोटी या मार्गाची दिशा बदलण्याचा प्रयत्न झाल्यास जिल्ह्यात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, अशी जनभावना आहे. मूळ प्रस्तावाप्रमाणे हा मार्ग लातूर-अंबाजोगाई-केज-पाटोदा-जामखेड-अहिल्यानगरमार्गे कल्याण असाच राबवण्यात यावा या मध्ये बदल करु नये.**

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात या प्रकल्पाची घोषणा करण्यात आली होती. बीड जिल्हा आधीच दुष्काळ, बेरोजगारी आणि स्थलांतराच्या गंभीर संकटाचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत हा महामार्ग जिल्ह्यासाठी संजीवनी ठरणार आहे. या मार्गामुळे प्रवासाचे १० ते १२ तासांचे अंतर ५ ते ७ तासांवर येणार असून इंधन आणि वेळेची मोठी बचत होणार आहे. शेतकऱ्यांचा माल मुंबई-पुण्यासारख्या बाजारपेठेत जलद पोहोचणे शक्य होणार असून, औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळणार आहे. परंतु, गेल्या काही दिवसांपासून हा महामार्ग शेजारी जिल्ह्याकडे वळवण्यासाठी काही लोकप्रतिनिधींकडून राजकीय दबाव टाकला जात असल्याची माहिती समोर येत आहे. ही बाब अत्यंत दुर्दैवी आणि बीड जिल्ह्यावर अन्याय करणारी आहे. बीड जिल्ह्याला जाणूनबुजून विकासापासून वंचित ठेवले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होत असून, यातून मोठा असंतोष पसरत आहे. नियोजित मार्गात बदल करणे जिल्ह्याच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे. जिल्ह्यातील शेतकरी, व्यापारी, युवक आणि सामाजिक संघटना आता या अन्यायाविरुद्ध एकत्र येत आहेत. जर सरकारने वेळीच सकारात्मक निर्णय घेऊन बीड जिल्ह्याचा हक्क अबाधित ठेवला नाही, तर जनतेकडून लोकशाही मार्गाने रस्ता रोको आणि जनसंघर्ष छेडला जाईल. महाराष्ट्राच्या संतुलित विकासात कोणत्याही जिल्ह्यावर अन्याय होऊ नये, हीच अपेक्षा जनतेतून व्यक्त होत आहे.

# आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश!

## पाटोदा-जामखेड राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला केंद्रीय स्तरावर गती; डीपीआरसाठी थेट आदेश

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा ते जामखेड दरम्यानच्या एनएच-५४८ऊ राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामाबाबत आमदार सुरेश धस यांनी ९ डिसेंबर रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे लेखी मागणी केली होती. या मागणीनंतर अवघ्या काही दिवसांत केंद्र शासन स्तरावर हालचाली सुरू झाल्या असून, सदरील रस्त्याच्या उर्वरित अपूर्ण टप्प्यासाठी पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे या मार्गावरील काम लवकर सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे.**

या संदर्भात रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाचे सल्लागार (तांत्रिक) बालासाहेब ठेंग यांनी २५ डिसेंबर रोजी अधिकृत पत्राद्वारे संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. या पत्रात एनएच-५४८ऊ अहमदपूर-अंबाजोगाई-मांजरसुभा-पाटोदा-जामखेड या राष्ट्रीय महामार्गावरील पाटोदा (जि. बीड) ते जामखेड (सुमारे ३० कि.मी.) हा भाग अद्याप अपूर्ण असून, तो बीड जिल्ह्यात अत्यंत खराब अवस्थेत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पत्रात नमूद केल्यानुसार, या रस्त्याच्या दयनीय स्थितीमुळे सामान्य नागरिक, प्रवासी व वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेऊन आमदार सुरेश



धस यांनी उर्वरित अपूर्ण लांबीसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची मागणी केली होती. या मागणीच्या अनुषंगाने सल्लागार (तांत्रिक) बालासाहेब ठेंग यांनी मंत्रालयाच्या वतीने प्रादेशिक अधिकारी, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, नवी मुंबई तसेच मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग), सार्वजनिक बांधकाम विभाग यांना थेट कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. विशेषतः मंत्रालयाच्या (चेठढक) मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक ती पुढील प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पत्राची माहिती आमदार सुरेश धस यांनाही देण्यात आली असून, तसेच छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय महामार्ग मंडळाचे अधीक्षक अभियंता यांनाही अवगत करण्यात आली आहे. यामुळे हा विषय आता केवळ मागणीपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष प्रशासकीय कार्यवाहीच्या टप्प्यात पोहोचल्याचे स्पष्ट होत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे करण्यात आलेल्या मागणीनंतर मंत्रालयाने तत्काळ दखल घेतल्याने पाटोदा-जामखेड या महत्त्वाच्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. डीपीआर तयार होऊन मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष रस्त्याचे काम लवकरच सुरू होईल, अशी माहिती शासकीय कंत्राटदार विश्वनाथ हुले यांनी दिली आहे अशी आशा या भागातील नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

# डॉ.महाडिक यांच्या अमृत महोत्सवानिमित्त खटोड प्रतिष्ठान यंदाचा कीर्तन महोत्सव

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या आठ वर्षांपासून आनंदऋषीजी नेत्रालय, अहिल्यानगरच्या माध्यमातून बीड व अहिल्यानगर जिल्हा मोतीबिंदू मुक्त करण्याचा संकल्प राबविणारे डॉक्टर अशोक महाडिक यांच्या अमृत महोत्सवानिमित्त खटोड प्रतिष्ठान यंदाचा कीर्तन महोत्सव बीडकरांसमोर साजरा करणार आहे.**

डॉ. अशोक महाडिक यांनी २०१७ साली सांगली-मिरज येथून आनंदऋषीजी नेत्रालयाचे सूत्रे हातात घेतली आणि संकल्प केला की बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील लोकांना मोतीबिंदूपासून मुक्त करण्यासाठी सेवा करावी. गेल्या आठ वर्षांमध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली आनंदऋषीजी नेत्रालयाद्वारे १,१९,००० हून अधिक नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आपल्या ४५ वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी गोरगरिब, कष्टकरी व शेतकरी जनतेसाठी मोतीबिंदू मुक्तीची सेवा केलेली आहे. आज, वयाच्या ७५व्या वर्षी, त्यांचा सामाजिक स्तरावरील अमूल्य योगदान साजरे करण्यासाठी खटोड प्रतिष्ठानने यंदाचा कीर्तन महोत्सव त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केला आहे. कीर्तन महोत्सवाची सुरुवात ३१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता होईल. हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे १० जानेवारी पर्यंत संपन्न होईल. कार्यक्रम सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत विविध सत्रांमध्ये चालणार असून महाराष्ट्रातील दिग्गज कथाकार व सांप्रदायिक कीर्तनकार आपली सेवा देतील. यामध्ये प्रमुख कार्यक्रम असे आहेत: ह.भ.प. प्रसिद्ध कथाकार साध्वी वैभव श्रीजी वृंदावन तीर्थ महात्म्य कथा ह.भ.प. प्रकाश महाराज काष्टे, परभणी चाणक्य नीति कथा महाराष्ट्रातील सांप्रदायिक कीर्तनकार आपली कीर्तन सेवा संपन्न करणार आहे हा प्रतिष्ठानाचा महोत्सव आता २५व्या वर्षात पदार्पण करत आहे. बीडकरांनी या महोत्सवाचा लाभ घेण्याची विनंती प्रतिष्ठानकडून करण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी जागरूक होणे गरजेचे-राहुल गिरी

## अभिनव पब्लिक स्कूलचा परिसंवाद मेळावा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**शिक्षणाच्या प्रवाहात वावरताना माय,माती आणि माणुसकी ची जाणीव मुलांना होण्यासाठी पालकांनी जागरूक होणे गरजेचे आहे.बालमनावर सुसंस्कार होण्यासाठी शिक्षकांसोबतच पालकाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते राहुल गिरी यांनी केले.येथील अभिनव पब्लिक स्कूलच्या शिक्षक-पालक परिसंवाद मेळाव्यात ते बोलत होते.**

पुढे बोलताना ज्याप्रमाणे राजमाता जिजाऊंनी छ.शिवाजी महाराजांवर संस्कार केले त्याच प्रमाणे मातापालकांची आपल्या मुलांबाबत योग्य ती भुमिका निभावली पाहिजे असे गिरी यांनी माता पालकांना मार्गदर्शनात आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनातून, पालकांना आपल्या पाल्याच्या संगोपनासाठी मार्गदर्शन मिळावे, शिक्षण क्षेत्रामध्ये नवनवीन होत असलेल्या बदलांची माहिती व्हावी, एक पालक म्हणून कोणती कर्तव्य पार पाडणे गरजेचे आहे यासाठी परिसंवाद मेळाव्याचे आयोजन शनिवारी अभिनव स्कूल ने केले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फ्लाइंग बर्ड अकॅडमीचे अध्यक्ष पांडुरंग चांडक, नवनियुक्त राजपत्रित अधिकारी श्रीकांत होरमाळे, प्रा.डॉ.रमेश गटकळ यांची प्रमुख उपस्थिती होती.पाल्यांचे शिक्षण घेताना भौतीक ज्ञान विकसित होणे, डिजिटल युगात केवळ चांगल्या गोष्टी आत्मसात करणे, मोबाईलचा अतिरेक न होणे यासाठी पालकांना मार्गदर्शन याप्रसंगी मान्यवरांनी केले.शाळेचे अध्यक्ष अभिमान पारेकर, गणेश गटकळ, गणेश लाटे यांच्या सह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या प्रसंगी श्रमदान केले.प्रा.डॉ.रमेश गटकळ यांच्या सुश्राव्य वाणीत पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## पान १ वरून...

### कापूस नोंदणी चार दिवसाने

आहे. नोंदणी न झाल्यास हमीभाव केंद्रात कापूस विक्रीपासून शेतकरी वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे. राज्यभरात सुमारे २७ लाख हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड झाली असून, यामध्ये विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांचा सर्वाधिक वाटा आहे. कापूस विक्रीसाठी शेतकऱ्यांना कपास किसान ॲपवर ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी ऑनलाइन पीक पेरा नोंद असणे आवश्यक आहे. मात्र, तांत्रिक अडचणी, सर्व्हर समस्या व माहिती अभावी राज्यात ११ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना पीक पेरा नोंद करता आलेली नाही. या गोंधळलेल्या धोरणामुळे शेतकरी वर्गात तीव्र असंतोष आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून ऑनलाइन नोंदणीची मुदत वाढवावी, तसेच ऑफलाइन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनाही हमीभाव केंद्रावर थेट विक्रीची परवानगी द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा लाखो शेतकरी हमीभावापासून वंचित राहून आर्थिक संकटात सापडतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

---------------

### काँग्रेसचे ५ जानेवारीपासून

काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या बैठकीत बोलताना खरगे म्हणाले की, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) ही केवळ योजना नसून संविधानाने दिलेला कामाचा हक्क आहे. मनरेगा रद्द केल्यामुळे जनतेमध्ये तीव्र असंतोष आहे आणि सरकारला त्याचे परिणाम भोगावे लागतील. हा कायदा गरिबांना चिरडण्यासाठी आणला गेला असून, काँग्रेस त्याविरोधात रस्त्यावर आणि संसदेत लढेल,असे ते म्हणाले. काँग्रेस अध्यक्ष खरगे यांनी २०२० - २१ मधील तीन कृषी कायद्यांविरोधातील शेतकरी आंदोलनाची आठवण करून देताना सांगितले की, लॉकडाऊनच्या काळात केंद्र सरकारने अध्यादेश काढून हे कायदे लागू केले. संसदेत विरोधकांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून कायदे मंजूर करण्यात आले. या आंदोलनात ७०० हून अधिक शेतकऱ्यांचा मृत्यू झाला, तरीही सरकारने आंदोलकांवर खिळे ठोकणे, पाण्याच्या तोफा वापरणे यांसारखी कठोर पावले उचलली. अखेर नोव्हेंबर २०२१ मध्ये पंतप्रधानांना माफी मागून हे कायदे रद्द करावे लागले, असे त्यांनी नमूद केले. पुढे खरगे म्हणाले, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ‘काळे कृषी कायदे’ रद्द होतील, अशी भविष्यवाणी आधीच केली होती आणि आता मोदी सरकारला मनरेगा पुन्हा लागू करावे लागेल, असेही त्यांनी भाकीत केले होते, असे त्यांनी सांगितले.

-------------

### नव्या वर्षात झेडपीचा

३३६ पैकी १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका अवघ्या २१ दिवसांच्या कालावधीत पूर्ण केल्या जाणार आहेत. यासाठी ८ जानेवारीपूर्वी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता निवडणूक आयोगातील वरिष्ठ सूत्रांनी व्यक्त केली आहे. जानेवारी महिन्यातच या १२ जिल्हा परिषदांमध्ये मतदानाचा टप्पा पार पडू शकतो, त्यादृष्टीने आयोगाची प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, २० जिल्हा परिषदा आणि २११ पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक असल्याने तेथील निवडणुकांना सध्या स्थगिती देण्यात आली आहे. ज्या ठिकाणी ५० टक्क्यांच्या आरक्षण मर्यादेचे पालन झाले आहे, अशा १२ जिल्हा परिषदांमध्ये पहिल्या टप्प्यात निवडणूक प्रक्रिया राबवली जाणार आहे. राज्यातील ग्रामीण भागातील सत्तेचे केंद्र असलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका दीर्घकाळापासून प्रलंबित होत्या. आता न्यायालयाच्या मर्यादेमुळे आणि आयोगाच्या सक्रियतेमुळे नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच राजकीय वातावरण तापणार आहे. १२५ पंचायत समित्यांचे भवितव्यही याच काळात ठरणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांनी आतापासूनच मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.

**पहिल्या टप्प्यात या जिल्ह्यांत निवडणूक होण्याची शक्यता**

पहिल्या टप्प्यात प्रामुख्याने सोलापूर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांमध्ये ६ ते ८ जानेवारीच्या दरम्यान निवडणूक कार्यक्रम अधिकृतपणे जाहीर होण्याची दाट शक्यता आहे. तर उर्वरित २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका ३१ जानेवारीनंतरच होण्याची चिन्हे आहेत.

-----------

### दोन कुटूंबातील पितापुत्राचा

अशा दोन कुटुंबांतील चार जण एकाच वेळी काळाच्या पडद्याआड गेल्याने घटनास्थळी उपस्थितांचे डोळे पाणावले. या दुर्दैवी घटनेमुळे साखरे व फुलारी कुटुंबांवर मोठा आघात झाला असून, केशेगाव गावासह परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. या दुर्दैवी घटनेमध्ये नागनाथ व रमिलंग व कासीम व रतन या पितापुत्राचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. साखरे व फुलारी या कुटुंबावर मोठा आघात झाल्याने संपूर्ण केशेगाव परिसरात शोककळा पसरली आहे.

----------

### भाजपला रावण राज

वसाहत उभारण्यासाठी शहराच्या तपोवन परिसरातील झाडे तोडण्याचा प्रस्ताव दिला होता. या निर्णयाला स्थानिक, पर्यावरण कार्यकर्ते आणि विरोधकांनी तीव्र विरोध केला होता. या महिन्याच्या सुरुवातीला राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने १५ जानेवारीपर्यंत महानगरपालिकेच्या योजनेला स्थगिती दिली आहे. ठाकरे म्हणाले, जर भाजपच्या मनात राम असता, तर त्यांनी तपोवनातील झाडे तोडली नसती. त्यांना ती जमीन बिल्डरांना द्यायची आहे. पक्षाची हिंदुत्वाची भूमिका अधिक राजकीय असल्याचे म्हटले. त्यांना रावण राज आणायचे आहे. भाजपला महाराष्ट्राला गिळंकृत करून विकसकांना भेट म्हणून देण्याची भूक लागली आहे. ही भूक महाराष्ट्राला, शहरांना संपवण्याची आणि देशाला मागे नेण्याची आहे. तरुण आणि महिलांसाठी रोजगार नाही. जंगले आता सुरक्षित नाहीत आणि शहरांच्या परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नाही, असे ते म्हणाले.

---------------

### संचमान्यतेसाठी वीस ऑक्टोबरपर्यंतची

विचारात घेऊन संचमान्यता उपलब्ध करून देण्याबाबत सुधारित दिनांक निश्चित करून देण्याबाबत १४ ऑक्टोबर रोजी शासनाकडे विनंती करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर संचमान्यतेबाबतचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. यासंदर्भात प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी म्हणाले, तांत्रिक अडचणींमुळे संचमान्यतेच्या तारखेला मुदतवाढ देऊन ती २० ऑक्टोबर करण्यात आली. त्यानुसार २० ऑक्टोबरपर्यंत आधार वैध होऊन युडायस प्लस प्रणालीवर नोंदणी झालेले विद्यार्थी आता संचमान्यतेसाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.

------------

### पालिका निवडणुकीत मशालीचा ज्योत

परभणी, धाराशिव या जिल्ह्यामध्ये झालेल्या नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीमध्ये भाजपाने सर्वाधिक ३५५, राष्ट्रवादी अजित पवार गट ३०१, शिवसेना शिंदे गट १४७, त्याबरोबर काँग्रेसने देखील १४७ जागेवर विजय मिळवला. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे ५४ आणि राष्ट्रवादी शरद पवार गट ५९ ठिकाणी विजयी झाले. मराठवाड्यातील राजकारणातील हॉट जिल्हा म्हणून बीडकडे पाहिले जाते. बीडमध्ये संमिश्र यश मिळाले असेच म्हणावे लागेल. भाजपाकडे दोन, राष्ट्रवादीकडे तीन आणि शरद पवार गटाकडे एक नगरपालिका राहिली. त्यामध्ये नगरसेवकांची संख्या आहे त्याच पद्धतीत आहे, मात्र पहिल्यांदाच भाजपाने बीड, गेवराई या ठिकाणी आपली ताकद दाखवली आहे. परळीमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट १७, भाजप एक, शिवसेना एकनाथ शिंदे दोन, रिपाइं एक, काँग्रेस एक आणि शरद पवार गटाचे दोन असे नगरसेवक निवडून आले. बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार १९, भाजप १५, राष्ट्रवादी शरद पवार १२, शिवसेना एकनाथ शिंदे तीन, शिवसेना उद्धव ठाकरे एक, काँग्रेस एक आणि एमआयएम एक. अंबाजोगाईमध्ये नगराध्यक्ष भाजप आघाडीचा असला तरी या ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गट १६, भाजप ७ आणि काँग्रेस ६ नगरसेवक विजय झाले. धारूरमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नगराध्यक्ष झाले. या ठिकाणी भाजप ९, राष्ट्रवादी अजित पवार गट सहा आणि अन्य दोन असे नगरसेवक निवडून आले. गेवराई नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदी भाजपाचे उमेदवार विजयी झाले. या ठिकाणी भाजपाचे १७ तर राष्ट्रवादीचा एक नगरसेवक निवडून आला. माजलगाव नगरपालिकेत शरद पवार गटाचे उमेदवार नगराध्यक्षपदी विराजमान झाले. या ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार १०, राष्ट्रवादी शरद पवार १०, अपक्ष तीन, भाजप एक, असे नगरसेवक निवडून आले. मात्र एकूण राज्यातील परिस्थिती पाहिली तर भाजपाने २४३१ नगरसेवक निवडून आणले. महायुतीने ४४२ हा आकडा पार केला. त्या तुलनेमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांना मात्र फारसे यश राज्यात आणि मराठवाड्यात मिळालेले दिसत नाही. यावरूनच शरद पवारांची तुतारी आणि उद्धव ठाकरे यांची मशाल पालिका निवडणुकीत मंदावल्याचे दिसून आले.

---------------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार दि. २८ डिसेंबर २०२५


## थोडक्यात

### प्रा.प्रकाश शिंदे यांना पीएचडी

माजलगाव । प्रतिनिधी



येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील लोकप्रशासन विभागात कार्यरत आसलेले प्रा. प्रकाश शिंदे यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत लोकप्रशासन विषयात पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे.

प्रा प्रकाश शिंदे यांनी प्रा.डॉ.भारत गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी समाजाची सुशासनातील भूमिका: महाराष्ट्रातील प्रशासकीय भ्रष्टाचार विरोधी जनअंदोलनाचे अवलोकन' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेऊन त्यांना विद्यापीठाने पीएच.डी.प्रदान केली आहे.प्रा.प्रकाश शिंदे यांच्या यशाबद्दल म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके,यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ॲड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ.जी.के. सानप,प्रभारी प्राचार्य डॉ.एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते,उपप्राचार्य पवन शिंदे,प्रबंधक प्रशांत चव्हाण,प्रा.डॉ. ज्ञानेश्वर शिंदे,प्रा. डॉ.विलास काळे,प्रा.सुदर्शन स्वामी यांनी अभिनंदन केले आहे.

### नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी सय्यद एजाज यांना संधी द्या

गेवराई । प्रतिनिधी



गेवराई नगर परिषद निवडणूक नुकतीच पार पडली असून, जनतेने पुन्हा एकदा पवार कुटुंबाच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भारतीय जनता पक्षाच्या बाजूने स्पष्ट कौल दिला आहे. महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपने गेवराई नगरपालिकेवर झेंडा फडकवत एकहाती सत्ता स्थापन केली आहे.

लोकनेते बाळराजे पवार, माजी आमदार लक्ष्मण पवार तसेच माजी मंत्री बदामराव पंडित यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वावर विश्वास ठेवून शहरातील मतदारांनी मतदानाद्वारे भरभरून आशीर्वाद दिल्याने सौ. गीताभाभी बाळराजे पवार यांचा नगराध्यक्षपदी विजय झाला आहे. एकूण २० जागांपैकी भाजपचे १६ उमेदवार विजयी झाले असून, २०२५ च्या नगर परिषद निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळाले आहे.मात्र, प्रभाग क्रमांक १० मधून भाजपचे धडाडीचे व लोकप्रिय उमेदवार सय्यद एजाज यांचा केवळ १९ मतांनी पराभव झाला. अत्यंत कमी फरकाने पराभूत झालेल्या सय्यद एजाज यांनी प्रचारकाळात नागरिकांच्या विविध समस्या मांडत प्रभावी जनसंपर्क साधला होता. सय्यद एजाज हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्यात सक्रिय असून, गोर-गरिबांच्या अडचणी सोडवण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आणि समाजहितासाठी कार्य करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.त्यामुळे लोकनेते बाळराजे पवार व माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी सय्यद एजाज यांची गेवराई नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी नियुक्ती करावी, अशी जोरदार मागणी शहरातील मुस्लिम समाजासह विविध सामाजिक घटकांकडून करण्यात येत आहे. स्वीकृत सदस्यपदी संधी दिल्यास वार्डाच्या व शहरातील नागरिकांच्या समस्या सोडतील असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.

### गोपाळ अर्बनच्या दिनदर्शिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या गोपाळ अर्बन च्या दिनदर्शिका (कॅलेंडर)चा प्रकाशन राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते व छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मोहनराव जगताप,राहुल जगताप व माजलगाव न प चे अध्यक्ष सहाल चाऊस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले तर या वेळी माजलगाव नगरीचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष सहाल चाऊस,नगरसेवक शरद यादव,राहुल लंगडे,सय्यद लतीफ ,गोविंद इतापे यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला या वेळी संतोषराव यादव,डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले, वकील संघाचे अध्यक्ष ड.सचिन सुतळे, पत्रकार विष्णुदादा उगले,दत्तात्रय गोपाळ, रियाज काझी ,ड. रोहित साबळे, रमेश बोरवडे, समीर नाईक आदींची प्रमुख उपस्थिती होती. सर्व मान्यवरांचा सत्कार चेअरमन विनोद गोपाळ, सि.ई.ओ बालाजी ईंगोले,रोखपाल नवनीता नाईकनवरे,व्यवस्थापक उध्दव नायबळ, राकेश जवळगावकर, विनोद ढगे,ज्योती जाधव, दत्तात्रय गिराम,ज्ञानेश्वर फपाळ,गणेश जाधव, व गोपाळ अर्बन परिवारानी केला.



# प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या गावांना स्थानिक विकास योजनेतून निधी देणार -आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

भारतरत्न नानाजी देशमुख यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघातील पाटोदा तालुक्यातील डोमरी येथे गुरुकुलाची स्थापना केलेली असून गोंडा ते बीड या त्यांच्या कार्याशी मी पूर्वीपासून निगडित असून नानाजी देशमुख यांचे समवेत बैठकीच्या निमित्ताने त्यांचा सहवास लाभलेला आहे त्यामुळे त्यांच्या नावाने असलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेमध्ये सहभागी होऊन आपली आर्थिक स्थिती सुधारावी या योजनेचे समन्वयक, ग्राम समिती यांनी या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुका हा अंमलबजावणी मध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये प्रथम क्रमांक वर अग्रेसर राहावा अशी आपली अपेक्षा आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले

आष्टी येथे आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने सरपंच ग्राम समिती यांच्या कार्यशाळेमध्ये ते बोलत होते यावेळी



व्यासपीठावर उपविभागीय कृषी अधिकारी श्री गरजे आष्टी तालुका कृषी अधिकारी श्री गोरक्ष तरटे पाटोदा आणि शिरूर तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले की''नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोकरा) हा केवळ सरकारी उपक्रम नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीचा मार्ग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील या योजनेचा दुसरा टप्पा आता सुरू झाला असून, आष्टी, पाटोदा आणि शिरूर मतदारसंघातील निवड झालेल्या गावांचा याद्वारे कायापालट होणार आहे. या योजनेत आपला मतदारसंघ राज्यात एक नंबरवर आणण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी झोकून देऊन काम करावे,'' असे आवाहन करताना ते म्हणाले की आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पहिल्या तीन क्रमांकावरील ग्रामपंचायत च्या सरपंचांना प्रोत्साहन पर स्थानिक विकास निधीतून विकास कामांना निधी देण्यात येईल असेही त्यांनी शेवटी सांगितले. आष्टी येथील लक्ष्मी लॉन्स येथे नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) तालुक्यातील समाविष्ट गावांच्या ग्रामस्तरीय समिती पारदर्शकता आणि प्रत्यक्ष पाहणीवर भर द्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

आमदार धस पुढे म्हणाले की, ''या योजनेतील लाभासाठी कृषी सेवकांनी गावात जाणे अनिवार्य आहे. कृषी सेवक गावात जातात की नाही याची खात्री करण्यासाठी त्यांना जीपीआरएस प्रणाली कार्यान्वित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शेडनेट, फुलशेती आणि शेळीपालनासारख्या जोडधंद्यांतून गरीब कुटुंबांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे, हा मुख्य उद्देश आहे. मी स्वतः प्रत्येक गावात जाऊन योजनेच्या कामाची पाहणी करणार आहे.''

**अधिकारी आणि मान्यवरांचे मनोगत**

उपविभागीय कृषी अधिकारी गर्जे (बीड): ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पहिला टप्पा यशस्वी झाला. आता दुसऱ्या टप्प्यात समितीतील राजकारण बाजूला ठेवून जास्तीत जास्त विकासकामे करण्यावर भर द्यावा.''

आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे: ''दुसऱ्या टप्प्यासाठी निवड झालेल्या गावांचे भाग्य उजळणार असून, शेतीपूरक व्यवसायांना यातून मोठी बळकटी मिळेल.''

सरपंच विघा गायकवाड: ''वैयक्तिक लाभासोबतच जास्तीत जास्त सार्वजनिक आणि सामाजिक कामांवर या योजनेतून भर द्यावा.''

**शेतकऱ्यांच्या सूचना आणि चर्चा**

या कार्यशाळेत विजय मरकड यांनी योजनेची माहिती लोकांच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचवण्याची गरज व्यक्त केली. तसेच बाळासाहेब चौरे, महेश कराळे, दिनकर टेकाळे, मच्छिंद्र शेंडगे आणि युवराज गंडाळ यांनी विविध तांत्रिक विषयांवर आपल्या सूचना मांडल्या. विठ्ठल वारे यांनी ग्रामीण भागातील लसीकरण आणि पशुवैद्यकीय सोयींकडे लक्ष वेधले, तर गोरख झेड चुंबळी यांनी गाव समितीमधील त्रुटींकडे लक्ष वेधले.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, तालुका कृषी अधिकारी शेळके (पाटोदा), गोरख तरटे (आष्टी) व कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी गणेश शिंदे व माऊली जरांगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल तृतीय

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील संस्कार शिक्षण मंडळ वडवणी संचलित प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलची कु.हर्षदा डिगंबर मुंडे हिने वडवणी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात तृतीय क्रमांक पटकावला.

तालुकास्तरीय ५३ वे विज्ञान प्रदर्शन वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवार दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे तसेच जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा वडवणी केंद्रप्रमुख शेख सैलानी सर,वडवणी गटसाधन केंद्रातील श्रीमती मैमुना





हर्षदा मुंडे हिची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीसाठी निवड

मॅडम,संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे या मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून व फीत कापून तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनात प्रमोद महाजन इंग्लिश स्कूलची कु. हर्षदा डिगांबर मुंडे (इ. ७ वी) हिने उच्च प्राथमिक गटात गणितीय रचना अंतर्गत मॅथेमॅटिक फन हे मॉडेल सादर केले होते या मॉडेलचा तृतीय क्रमांक आला.

या बालसंशोधिका विद्यार्थिनीला सौ.प्रणिता तांबडे मॅडम,सौ.नितल कुरकुटे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

वडवणी तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या इतिहासामध्ये पहिली प्रमोद महाजन इंग्लिश स्कूल ज्या इंग्लिश स्कूलचा तृतीय क्रमांक आला.प्रा.पाटील सर व प्राध्यापिका शेळके मॅडम यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.मान्यवरांच्या हस्ते प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन स्वागत व सन्मान करण्यात आला. कु.हर्षदा डिगांबर मुंडे या विद्यार्थिनीचे व तिला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिकेचे या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तसेच संस्थेचे उपाध्यक्ष तथा बीड भाजपा युवामोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे,मार्केट कमिटीचे संचालक रणजीत धस,संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे,इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शितल लाटने,चव्हाण मॅडम,अबुज मॅडम यांच्यासह इंग्लिश स्कूलमधील सर्व शिक्षिका यांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन करून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पान ६ वरुन...

### बीडमध्ये ज्वारी

अहवाल, आणि संभाव्य भ्रष्टाचारावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.निकृष्ट ज्वारीचा साठा, बनावट दर्जा अहवाल आणि उशिरा घेतलेली स्थगिती हे सर्व एका मोठ्या घोटाळ्याकडे निर्देश करत आहेत. स्वतंत्र चौकशी, दोषींवर कठोर कारवाई आणि जबाबदार अधिकाऱ्यांचे निलंबन हीच आता वंचित बहुजन आघाडीची ठाम आणि स्पष्ट मागणी आहे.

बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन

चौकट :- मालदांडी ज्वारीची खरेदी ३,४२१ प्रति क्विंटल दराने सुमारे ९० हजार क्विंटल खरेदी करण्यात आली असून, यावर अंदाजे ३० कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची प्रत्यक्ष भेट घेतली. यावेळी शहरातील ३६ स्वस्त धान्य दुकानांना भेट देऊन तेथून गोळा करण्यात आलेली निकृष्ट दर्जाची ज्वारी प्रत्यक्ष दाखविण्यात आली. यावर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांना तात्काळ कळवतो असे सांगितले. त्यानुसार दिनांक २६.१२.२०२५ रोजी सायंकाळी ठीक ४ वाजता जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. शिवकुमार स्वामी यांनी तहसीलदारांना ज्वारीचे वितरण तात्काळ थांबविण्याचे आदेश दिले.

### आष्टीतील हॉटेल धाब्यावर

पोलीस असमर्थ ठरत आहेत. या ठिकाणी सर्वसामान्य नागरिकांनी या तळीरामांना विरोध केला तर त्यांना शिवीगाळ केली जाते. त्यांना धमक्या दिल्या जातात. त्यामुळे नागरिकही अशा लोकांच्या नादी लागत नाहीत. या प्रकाराने सर्वसामान्य नागरिक त्रासले असून या तळीरामा विषयी तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पोलीस हा प्रकार बंद करणार आहेत की नाहीत असा सवाल नागरिकातून केला जात आहे. हा प्रकार बंद झाला नाही तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही सुजाण नागरिकांनी दिला आहे.

### ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार

शेख इत्यादी उपस्थित होते. हा सत्काराचा कार्यक्रम नुकताच पार पाडला असून एक पत्रकारातील सदस्य नगरपरिषद मध्ये नगरसेवक म्हणून पत्रकारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी गेल्याने सर्व पत्रकारात बांधवांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप जोशी यांनी तर आभार प्रदर्शन पत्रकार संघाचे अध्यक्ष अंकुश आतकरे यांनी केले.

### महात्मा फुले युवा

आवाहन केले. महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे यांनी महाराष्ट्रभरातील महात्मा फुले युवा दलाचे सर्व कार्यकर्ते या कार्यक्रमासाठी उपस्थित राहतील असा शब्द जयकुमार गोरे यांना दिला.या सत्कारप्रसंगी ॲड. सतीश शिंदे, ॲड.राजेंद्र राऊत,महात्मा फुले युवा दल बीड जिल्हा उपप्रमुख संजय काळे,पाटोदा तालुकाप्रमुख गणेश मोहळकर,सुलतानपूरचे सरपंच धनेश्वर खेत्रे,प्रदीप अण्णा गायकवाड, सचिन दुधाळ, मयूर आखाडे,धर्मराज दुधाळ,रमेश भाऊ दुधाळ, संकेत गिरी, सुधीर शिंदे, सुरेश राऊत यांच्यासह महात्मा फुले युवा दवाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

### कानडी घाट येथे

टपरीत चालक शेंडगे हे सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. शनिवार रोजी शेंडगे यांची चौसाळा येथील ज्येष्ठ पत्रकार एन. टी. वाघमारे यांनी भेट घेऊन विचारपूस केली व त्यांना मानसिक आधार दिला. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, तसेच या परिसरात यापूर्वीही किरकोळ चोरीच्या घटना घडल्याने गस्तीत वाढ करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### दोन जिल्हा परिषद

हा तालुका आदरणीय लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेबांच्या प्रयत्नातून अस्तित्वात आला असून, त्यांच्या विचारांची आणि कार्याची परंपरा पुढे नेणे हे प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य आहे, असेही नमूद करण्यात आले. इच्छुक उमेदवारांच्या निवड प्रक्रियेबाबत स्पष्ट भूमिका मांडण्यात आली. प्रत्येक इच्छुकांचे अर्ज स्वीकारले असून कोणालाही नकार दिला जाणार नाही. उमेदवारीचा अंतिम निर्णय पक्ष नेतृत्वाकडून घेतला जाणार आहे. येत्या १ तारखेला पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेणार असल्याचे मत जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी व्यक्त केले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, माजी आमदार केशवराव आंधळे, निवडणूक प्रभारी योगेश क्षीरसागर, नवनाथ शिराळे, शांतिनाथ डोरले, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, गणेश लांडे, सोमनाथ बडे, दिनकरराव आंधळे, उपसभापती अनिल चोले, उपनगराध्यक्ष बनसीधर मुंडे, भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे, मच्छिंद्र झाटे, अमरसिंह मस्के, अंकुश वारे, विश्वनाथ झाटे, अंकुश वारे, श्रीमंत मुंडे, शिवाजी मुंडे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, तालुका उपाध्यक्ष महादेव सावंत, धनराज मुंडे, बालासाहेब बादाडे, उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय भाऊ आंधळे यांनी केले तर आभार मच्छिन्द्र झाटे यांनी केले यावेळी भाजपचे इच्छुक उमेदवारांसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संविधानाच्या रक्षणासाठी पत्रकारांनी आपली लेखणी चालवावी - मिलिंद घाडगे

परळी । प्रतिनिधी

भारतीय संविधानाच्या रक्षणासाठी परळी तालुक्यातील पत्रकारांनी आपली लेखणी समर्थपणे चालवावी असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांनी केले.परळी शहर व तालुका पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे यांच्या निवासस्थानी नुकताच सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष रानबा गायकवाड, तालुका कार्याध्यक्ष नितीन ढाकणे, शहराध्यक्ष शेख मुकरम व सल्लागार भगवान साकसमुद्रे यांचा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भारतीय संविधानाची प्रत,शाल व पुष्पहार घालून सत्कार करण्यात



आला.यावेळी बोलताना वंचितचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे म्हणाले की, लोकशाहीत पत्रकारांचे स्थान अतिशय महत्वाचे आहे.लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी तसेच संविधानाच्या रक्षणासाठी पत्रकारांनी आपली लेखणी चालवावी अशी अपेक्षा व्यक्त केली.याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बालासाहेब जगतकरच, ॲड. सुरज घाडगे, तालुका अध्यक्ष गौतम साळवे, तालुका युवा अध्यक्ष राजेश सरवदे, माजी नगरसेवक केशव गायकवाड, तालुका युवा महासचिव ज्ञानेश्वर गीते, युवा नेते शेख शाकीर, गोविंद गीते आधी पदाधिकारी उपस्थित होते.

## आमदार सुरेश धस यांची आश्वासनपूर्ती !

### सौंदाना येथील शेतकरी कमी वीजदाबाच्या समस्येतून मुक्त

**पाटोदा । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या मूलभूत समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देत आमदार सुरेश धस यांनी सौंदाना गावातील शेतकऱ्यांचा दीर्घकाळ प्रलंबित असलेला वीजेचा प्रश्न सोडवून आश्वासनपूर्ती केली आहे. पाटोदा तालुक्यातील सुमारे पंधराशे लोकसंख्या असलेल्या सौंदाना गावात शेतीसाठी कमी दाबाने होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. मोटारी चालत नसल्याने सिंचन विस्कळीत होत असून शेतीकामे वेळेवर होत नव्हती.

या गंभीर समस्येबाबत गावचे उपसरपंच चंद्रसेन कदम यांनी काही महिन्यांपूर्वी शेतकऱ्यांसह आमदार सुरेश धस यांची भेट घेऊन सविस्तर माहिती दिली होती. शेतकऱ्यांची अडचण समजून घेत आमदार धस यांनी तात्काळ महावितरणकडे पाठपुरावा सुरू करून हा प्रश्न



प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवत आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून सौंदाना गावासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर मंजूर करून देण्यात आला.

विशेष म्हणजे, हा नवीन ट्रान्सफॉर्मर २५ डिसेंबर रोजी प्रत्यक्ष कार्यान्वित करण्यात आला. त्यामुळे आता सौंदाना परिसरातील शेतकऱ्यांना योग्य दाबाने वीजपुरवठा उपलब्ध होणार असून सिंचन व्यवस्था सुरळीत होण्यास मोठी मदत होणार आहे. याचा थेट फायदा पिकांच्या उत्पादनावर होऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान थांबणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात विजेच्या समस्या असताना त्या केवळ मांडून न थांबता प्रत्यक्षात सोडवणारे नेतृत्व म्हणून आमदार सुरेश धस यांची भूमिका अधोरेखित झाली आहे. या आश्वासनपूर्तीबद्दल उपसरपंच चंद्रसेन कदम यांच्यासह ग्रामस्थ सुरेश कदम, दत्ता कदम, शिवराज कदम, ऋषिकेश कदम, ईश्वर कदम, मंगेश कदम यांनी आमदार सुरेश धस यांचे मनापासून आभार मानले असून शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेल्या या ठोस कार्यवाहीचे स्वागत केले आहे.

# भक्ती, परंपरा आणि आनंदाचा मक्रध्वज जन्मोत्सव महासोहळा

## चिंचवन नगरीत राजा मक्रध्वज जन्मोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील चिंचवन येथे हनुमान पुत्र मकरध्वज जन्मोत्सवाची भव्य तयारी झाली असून उद्या दिनांक २७ डिसेंबर पासून मकरध्वज जन्मोत्सव सोहळा सुरू होत आहे. या सोहळ्यात भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह आयोजित केला असून बीड जिल्हा आणि डोंगर पट्ट्यातील लाखो भाविकांची या ठिकाणी गर्दी होणार आहे.

हनुमान पुत्र मकरध्वज आणि हनुमानाची ज्या ठिकाणी ओळख झाली ते रामायण काळातील ठिकाण मंकावती म्हणजे आजचे वडवणी तालुक्यातील चिंचवन हे गाव होय. या ठिकाणी मकरध्वजाचे पुरातन कालीन मंदिर आहे. संत भगवान बाबांनी या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह आणि मकरध्वज जन्मोत्सवाची सुरुवात केली. चिंचवन गावासह डोंगरपट्ट्यातील अनेक गावातील भावीक या ठिकाणी सप्ताह सोहळ्यासाठी सहभागी होतात. बीड जिल्हा आणि राज्यभरातून लाखो भाविक या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी येतात. गावातील सर्व जाती-धर्माचे लोक मोठ्या आनंदाने उत्सवात सहभागी होतात. मुस्लिम बांधव देखील या सोहळ्यामध्ये सक्रिय सहभागी असतात. असा हा सोहळा या भागातील भाविकांना आनंद देणारा असतो. भक्ती परंपरा आणि आनंदाने भरलेला हा सोहळा यावर्षी देखील भव्य दिव्य स्वरूपात होणार आहे. या सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन चिंचवन गावकऱ्यांनी केले आहे.



**राज्यातील नामवंत कीर्तनकारांची हजेरी**

मकरध्वज जन्मोत्सव सोहळ्यात आठ दिवस महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत. मकरध्वज जन्ममहोत्सव सोहळ्यामध्ये ह. भ .प.पुरुषोत्तम महाराज कुटुळे यांचे मोलाचे योगदान आहे. पहिल्या दिवशी दि. २७ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथील ह.भ.प. तपोनिधी महादेव महाराज चाकरवाडीकर, दि. २८ रोजी राजा हरिश्चंद्र तीर्थक्षेत्राचे मठाधिपती महंत भगवान महाराज राजपूत,

दि. २९ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र इंगळे महाराज परमार्थ आश्रमाचे अध्यक्ष ह. भ. प. सोपान महाराज इंगळे (चिंचवडगाव),

दि. ३० डिसेंबर रोजी ह. भ. प. वासुदेवदास बाबा बैरागी देशमुख (टाकळी), दि. ३१ डिसेंबर रोजी ह.भ.प. केशव महाराज घुले शास्त्री (टाकळी), दि. ०१ जानेवारी रोजी ह. भ. प. सिद्धेश्वर महाराज गाडे (दगडगाव),

दि. ०२ जानेवारी रोजी ह. भ. प. प्रकाश महाराज साठे (धारूर) यांचे कीर्तन होणार आहे. तर

दि. ३ जानेवारी रोजी सूर्योदय होताच श्री राजा मक्रध्वज महाराजांचा जन्मोत्सव साजरा करण्यात येणार असून, सकाळी अकरा ते एक या वेळेत काल्याचे कीर्तन ह. भ. प. व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद पंगत आयोजित करण्यात आली आहे.

**सप्ताहातील अन्नदाते**

या सप्ताहात दररोज भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली असून, यासाठी अनेक अन्नदात्यांनी सेवाभावाने पुढाकार घेतला आहे.

**सकाळचे अन्नदाते :**

सोपान दत्तू कोटुळे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान चिंचवन, बालासाहेब कोटुळे, अशोक शिंदे, सोमनाथ मात्रे, बद्रीनाथ मात्रे, मोतीराम मात्रे, पांडुरंग मात्रे, भागवत मात्रे, बाबुराव तवरे (सुतार), हमाल मापाडी संघटना चिंचवन, आश्रुबा धोंडीराम गिलबिले, पांडुरंग धोंडीराम गिलबिले, विठ्ठल धोंडीराम गिलबिले.

**दुपारचे अन्नदाते :**

ज्ञानोबा कारभारी कोटुळे, रंगनाथ बडे, लिंबा मात्रे, शहादेव मात्रे, राजेश नेटके, गोरक्षनाथ विद्यालयाचे व भगवान बाबा माध्यमिक विद्यालयाचे सर्व सर्व माझी प्राचार्य सोमनाथ निवृत्ती बडे पाटील व पंचदीप परिवार, रामा गणपत शिंदे, प्रल्हाद रामनाथ मात्रे, रामनाथ बडे, मेघराज बडे, राधाकिसन कोटुळे, अशोक कोटुळे, गणेश शिवाजी कोटुळे.

**भारतातील एकमेव मंदिर**

हनुमान पुत्र मकरध्वज यांचे भारतात आणि जगातील एकमेव मंदिर हे बीड जिल्ह्यातील चिंचवन येथे आहे. याच ठिकाणी अहिरावण महिरावणचा वध करून राम-लक्ष्मणाची सुटका हनुमंताने केली होती. याच ठिकाणी मकरध्वज द्वारपाल म्हणून सेवा देत होते. हनुमान आणि मकरध्वजाची येथेच ओळख झाली. रामायण काळातील मंकावती आणि आजचे चिंचवन असलेल्या या ठिकाणाला ऐतिहासिक महत्त्व आहे.

cmyk

# कराडच्या कृषी प्रदर्शनात एआय तंत्रज्ञानावर भर; शंभूराज देसाई यांच्या हस्ते उद्घाटन

कराड : शेतकऱ्यांना दरवर्षी काहीतरी नवीन देण्याची कराडच्या कृषी प्रदर्शनाची परंपरा आजही कायम असून या प्रदर्शनाचा शेतकऱ्यांना मोठा लाभ होत आहे, असे गौरवोद्गार राज्याचे पर्यटन मंत्री व सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी काढले. कराड कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा परिषद व महाराष्ट्र राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विसावे राज्यस्तरीय यशवंतराव चव्हाण कृषी, औद्योगिक व पशुपक्षी प्रदर्शन व जिल्हा कृषी महोत्सवाचे उद्घाटन ना. शंभूराज देसाई यांच्या हस्ते फीत कापून व दीपप्रज्वलनाने करण्यात आले

यावेळी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष खा. नितीनकाका पाटील, कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे, आमदार नरेंद्र पाटील, कराडचे लोकनियुक्त नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, रयत साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. उदयसिंह पाटील उंडाळकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, जिल्हा बँकेचे संचालक राजेश पाटील, राष्ट्रवादी किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुनील पाटील, कार्यकारिणी सदस्य विजयसिंह



यादव, युवा नेते आदिराज पाटीलउंडाळकर, जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा कृषी अधीक्षक भाग्यश्री पवार-फरांदे, जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रिक, आत्माचे प्रकल्प संचालक अजय शेंडे, जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी गजानन ननावरे, पशुसंवर्धनचे जिल्हा उपायुक्त डॉ. दिनकर बोर्डे, कराडचे प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, पोलीस उपअधीक्षक राजश्री पाटील, उपविभागीय कृषी अधिकारी समीर पवार, गटविकास अधिकारी प्रताप पाटील, तालुका कृषी अधिकारी प्रशांत शेंडे आदींसह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. शंभूराज देसाई म्हणाले, २० वर्षांपूर्वी स्वर्गीय विलासराव पाटील (काका) यांनी कराडसह सातारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, या उद्देशाने स्वर्गीय यशवंतराव चव्हाण कृषी प्रदर्शनाची मुहूर्तमेढ रोवली. यंदाच्या प्रदर्शनात कृषी क्षेत्रातील 'एआय' (कृत्रिम बुद्धिमत्ता) तंत्रज्ञानावर विशेष भर देण्यात आला आहे. आज ९० टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड मोबाईल असल्याने या तंत्रज्ञानाचा मोठा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा. आपला भारत देश कृषीप्रधान असून शेतकरी बळकट झाला तरच अर्थव्यवस्था मजबूत होईल. यावेळी ॲड. उदयसिंह पाटील उंडाळकर म्हणाले, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, शेतीतील बदल व आधुनिक तंत्रज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचावे, यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरत आहे. यंदा एआय तंत्रज्ञानावर दिलेला भर शेतकऱ्यांसाठी निश्चितच लाभदायक ठरेल.




### महत्वाच्या घटना

१६१२ : गॅलिलिओ गॅलिली याने प्रथमच नेपच्यून या ग्रहाचा शोध लावला. मात्र तेव्हा त्याला तो तारा आहे असे वाटले होते.
१८३६ : स्पेनने मेक्सिकोच्या स्वातंत्र्याला मान्यता दिली.
१८४६ : आयोवा हे अमेरिकेचे २९ वे राज्य बनले.
१८९५ : ऑगस्टा व लुई या ल्युमियर बंधूंनी पॅरिस येथे चित्रपटाचा जगातील पहिला खेळ सादर केला. या खेळाचे तिकीट होते एक फ्रँक.
१८८५ : मुंबई येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना
१९०८ : मेसिना, सिसिली येथे भूकंप. ७५००० लोकांचे निधन.
१९२६ : इंपिरियल एयरवेज ने भारत आणि इग्लंड यांच्या मध्ये पहिली पोस्ट सेवा सुरु केली.
१९४८ : मुंबई राज्यात कसेल त्यांची जमीन हा कुळ कायदा लागू झाला.
१९८३ : भारताचे माजी क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी वेस्ट इंडीज विरुद्ध ३० वे शतक पूर्ण करून सर डॉन ब्रॅडमन यांचा रेकॉर्ड तोडला.
१९८४ : राजीव गांधींच्या नेतृत्वामध्ये कॉंग्रेसने लोकसभेची निवडणूक जिंकली.
१९९५ : कझाकस्तान मधील बैकानूर अंतराळ तळावरून भारताच्या आयआरएस १-सी या दूरसंवेदन उपग्रहाचे प्रक्षेपण केले.
२००० : भारतीय डाक विभागाने वीरता पुरस्काराच्या सन्मानार्थ पाच पोस्टाचे तिकीटांचा एक सेट ३ रुपयांचे एक सचित्र तिकीट जारी केले.
२०१३ : आम आदमी पार्टी ने कॉंग्रेस सोबत गठबंधन करून दिल्ली मध्ये सरकार बनविले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : वूड्रो विल्सन - अमेरिकेचे २८ वे राष्ट्राध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ३ फेब्रुवारी १९२४)
१८९९ : गजानन त्र्यंबक तथा ग. त्र्यं. माडखोलकर - कादंबरीकार, समीक्षक आणि पत्रकार (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९७६)
१९०३ : हंगेरीत जन्मलेला गणितज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ, गणकशास्त्रज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञ जॉन फोन न्यूमन यांचा जन्म.
१९११ : फणी मुजुमदार  चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक. दूरदर्शनवर लोकप्रिय झालेल्या 'रामायण' या मालिकेची पटकथा त्यांनी लिहिली होती. १९२२: अमेरिकन कॉमिक्स लेखक स्टॅन ली यांचा जन्म.
१९२६ : हुतात्मा शिरीषकुमार (मृत्यू: १० ऑगस्ट १९४२)
१९३२ : धीरुभाई अंबानी - उद्योगपती (मृत्यू: ६ जुलै २००२)
१९३७ : जगप्रसिद्धभारतीय उद्योजक रतन टाटा यांचा जन्म.
१९४० : ए. के. अँटनी - भारताचे परराष्ट्रमंत्री
१९४१ : भारतीय-पाकिस्तानी क्रिकेटर आणि प्रशिक्षक इंतिखाब आलम यांचा जन्म.
१९४५ : वीरेंद्र - नेपाळचे राजे (मृत्यू: १ जून २००१)
१९५२ : अरुण जेटली - केंद्रीय मंत्री व वकील
१९६९ : लिनक्स गणक यंत्रप्रणालीचा जनक लिनस तोरवाल्ड्स यांचा जन्म.
२००१ : अंडर-१९ च्या भातीय टीम चे सदस्य यशस्वी जैसवाल चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६३ : फ्रॅन्सेस्को मारिया ग्रिमाल्डी - इटालियन गणितज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २ एप्रिल १६१८)
१९३१ : आबालाल रहमान - चित्रकार (जन्म: ? ? १८६०)
१९७१ : पंजाबी साहित्यिक नानकसिंग यांचे निधन.
१९७४ : राजस्थान चे पहिले मुख्यमंत्री हीरा लाल शास्त्री यांचे निधन.
१९७७ : सुमित्रानंदन पंत - छायावादी विचारधारेतील हिन्दी कवी (जन्म: २० मे १९००)
१९८१ : हिन्दी चित्रपटांत चार दशके चरित्र अभिनेत्याच्या भूमिका करणारे डेविड अब्राहम चेऊलकर तथा डेविड यांचे कॅनडातील टोरांटो येथे निधन झाले.
२००० : मेघश्याम पुंडलिक तथा मे. पुं. रेगे - तत्त्वचिंतक, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष (जन्म: २४ जानेवारी १९२४ वेंगुर्ला)
२००० : ध्रुपदगायक उस्ताद नसीर अमीनुद्दीन डागर यांचे निधन.
२००२ : पद्मश्री पुरस्काराने सन्मानित अच्युत कानविंडे यांचे निधन
२००३ : कृष्णाजी सुंदरराव तथा कुशाभाऊ ठाकरे यांचे निधन.
२००६ : प्रभाकर पंडित - संगीतकार व व्हायोलिनवादक (जन्म: ३० सप्टेंबर १९३३).

## राज्यात उत्पादित होणाऱ्या डाळिंब व अन्य फळांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील-पणन मंत्री जयकुमार रावल



मुंबई

राज्यातील शेतकरी निर्यातक्षम फळे व भाजीपाला पिकवतात. या उत्पादनांना स्पर्धात्मक दर मिळावा म्हणून आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले. राज्यात उत्पादित झालेल्या डाळिंबाचे तीन कंटेनर वाशी येथील सुविधा केंद्रातून के.बी. एक्सपोर्ट्सचे चेअरमन प्रकाश खाखर यांनी नुकतेच ब्रिस्बेन - (ऑस्ट्रेलिया), न्यूयॉर्क, लॉस एंजेलिस- (अमेरिका) येथे निर्यात केले. या पार्श्वभूमीवर पणन मंत्री रावल यांनी प्रकाश खाखर यांचे अभिनंदन केले. त्यावेळी ते बोलत होते.


जागतिक बाजारपेठेत भारतीय डाळिंबांची मागणी सातत्याने वाढत आहे. राज्यात उत्पादित होणारा डाळिंब हा अमेरिका, ऑस्ट्रेलिया यासह अन्य देशात निर्यात होत आहे. टप्प्याटप्प्याने इतर फळांची निर्यात करण्यासाठी पणन विभाग प्रयत्न करत आहे. यामुळे फळे व भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांच्या मेहनतीला जागतिक बाजारपेठेत स्पर्धात्मक मूल्य मिळेल. अमेरिका, ऑस्ट्रेलिया यासह अन्य देशांमध्ये कंटेनर रवाना होणे हे राज्याच्या कृषी-निर्यात व शेतकऱ्यांना उत्पन्नवाढीच्या दृष्टीने प्रोत्साहित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. येणाऱ्या काळात निर्यात सुविधा केंद्रातून मोठ्या क्षमतेने डाळिंब निर्यात केले जाणार असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

## चार गायींच्या संकरापासून निर्मितराठी गाय ठरतेय सर्वाधीक उपयोगी

दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी जास्तीत जास्त दूध देणारी गाय महत्वाची असते. पण जर या गायीला खर्च कमी येत असेल तर अजूनच सोने पे सुहागा. या उपयुक्त गायीचे नाव आहे राठी गाय. राठ समाजाने थारपारकर, लाल सिंधी तथा साहिवाल आणि धन्नी या भारतीय गोवंशाचे संकर करून 'राठी' या गोवंशाची निर्मिती केली. राठ नावाच्या भटक्या मुस्लिम जमाती ने याचे मोठ्या प्रमाणावर संगोपन केले आहे, त्यामुळे या गोवंशाला 'राठी' किंवा 'राठ' असे नाव पडले.

देशी गायींमध्ये राठी जातीची गाय ही फार चांगली मानली जाते. राजस्थानच्या बीकानेरपासून ते पंजाबच्या सीमेपर्यंतच्या प्रदेशात आढळणाऱ्या या गायीला राजस्थानची कामधेनूही म्हटले जाते. या जातीच्या गायी देशाच्या अनेक भागात सहज दिसतात. उत्तर प्रदेशात शेतकरी या गायी कमी किमतीत विकत घेऊन पाळू शकतात. या गायींची किंमत २० हजार रुपयांपासून ६० हजार रुपयांपर्यंत आहे. साहिवाल गायीशी मिळते जुळते गुणधर्म या गायीचे आहेत. इतर गाई पेक्षा दूध देण्याची क्षमता या गाईंची जास्त असते. जर वातावरण पोषक असेल तर पशुपालक या गाईंपासून जास्तीचे दुधाचे उत्पन्न मिळू शकतात.


शरीर रचना : राठी गाय ही तिच्या रंगाने आणि आकाराने दिसायला आकर्षक आहे. या गोवंशाचा आकार मध्यम असून अंग भरीव असते. या गोवंशाचे डोके मोठे असून कपाळ रूंद आणि पसरलेले असते. डोळे काळे आणि पाणीदार असतात. कान छोटे असून आतील बाजूस लालसर तपकिरी असतात. या गोवंशाची मान थोडी आखूड असून गळकंबळ किंवा पोळी थोडी मोठी आणि आखीव असते. पाय सामान्य आकाराचे असून खुर मात्र मोठे आणि काळे असतात. शेपटी लांब असून शेपुटगोंडा झुपकेदार, केसाळ आणि काळ्या रंगाचा असतो. या गोवंशाचा रंग लाल-तांबडा असून त्यावर पांढरे डाग असतात आणि पोटाशी रंग फिक्कट होत गेलेला असतो. या जातीच्या गायीची उंची सुमारे १४४ सेंटीमीटरपर्यंत आहे. याशिवाय राठी जातीच्या गायीचे वजन सुमारे ३०० किलो असते. या जातीच्या बैलाचे वजन सुमारे ३५० किलो असते.दूध उत्पादन : देशी जातीच्या गायीत राठी गाय ही दूध उत्पादनात सर्वात महत्त्वाची मानली जाते. या जातीची गाय ही एक वर्षाला सुमारे २८०० किलो दूध देते. वयाच्या ३६ ते ५२ व्या वर्षी राठी गाईचे पहिले दुग्धपान सर्वोत्तम मानले जाते. त्यानंतर ते दररोज ८ ते १८ लिटर दूध देते.



## कोकण सोडून इतर भागांतील आंबा पिकासाठी विमा योजना

आंबा पिकासाठी विमा योजनेत अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित फळपिकासाठी कुळाने, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसहित इतर सर्व शेतकरी भाग घेऊ शकतात. गारपीट या हवामान धोक्यापासून आंबिया बहरामधील फळपिकांना विमा संरक्षण दिले जाते. त्यासाठी नियमित विमा व्यतिरिक्त वेगळा विमा हप्ता बँकेत भरावा लागतो.

विमा योजना कोकण सोडून इतर भागांतील आंबा पिकासाठी अहिल्यानगर,लातूर, धाराशिव,परभणी, नांदेड, वाशीम, जालना, सोलापूर, धुळे, जळगाव, नंदुरबार, बुलडाणा, छत्रपती संभाजीनगर, बीड, नाशिक, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा या अधिसूचित जिल्हा, तालुक्यातील अधिसूचित महसूल मंडळात लागू आहे. या जिल्ह्यात शासनामार्फत अधिसूचित महसूल मंडळ पातळीवर असलेल्या शासकीय हवामान केंद्र आकडेवारीवरून नुकसान भरपाई अंतिम केली जाते. या योजनेअंतर्गत आंबा



पाच वर्ष वय झालेल्या पिकास निवडलेल्या विमा कंपनी मार्फत खाली नमूद केलेल्या विमा संरक्षण कालावधीत निवडक हवामान धोक्यामुळे होणाऱ्या संभाव्य पीक नुकसानीस (आर्थिक) पुढील प्रमाणे विमा संरक्षण प्रदान होईल.

शेतकऱ्यांचा योजनेतील सहभाग : योजनेत अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित फळपिकासाठी कुळाने, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसहित इतर सर्व शेतकरी भाग घेवू शकतात. पीककर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदारांसाठी योजनेतील सहभाग ऐच्छिक राहणार आहे. बिगर कर्जदार शेतकरी विहित मुदतीत बँकेत विमा हप्ता जमा करून सहभाग घेऊ शकतात. त्यासाठी आधार कार्ड, जमीन धारणा ७ /१२ , ८(अ) उतारा व पीक लागवड स्वयंघोषणा पत्र, फळबागेचा जिओ टॅगिंग केलेला फोटो, बँक पासबुकवरील बँक खात्याबाबत सविस्तर माहिती लागेल. कॉमन सर्व्हिस सेंटर मार्फत अर्ज ऑनलाइन भरता येतील. एक शेतकरी त्याच्याकडे एकापेक्षा अधिक फळपिके असल्यास योजना लागू असलेल्या पिकांसाठी तो विमा योजनेत सहभाग घेऊ शकतो, मात्र त्या फळपिकासाठी ते महसूल मंडळ अधिसूचित असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी फळपीक लागवड केलेली नसताना किंवा उत्पादन योग्य फळपीक नसताना, दुसऱ्याच्या जमिनीवर किंवा शासनाच्या जमिनीवर, अकृषक जमिनीवर विमा काढून विमा योजनेत सहभाग घेतल्यास त्यांचे विरुद्ध कडक कारवाई होऊ शकते. यासाठी ज्या शेतकऱ्यांकडे उत्पादन योग्य वयाची फळबाग आहे, त्यांनी योजनेत सहभाग घ्यावा. शेतकऱ्यांनी स्वतःच्या जमिनीवर फक्त विमा घ्यावा. शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता हा सर्वसाधारणपणे विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्क्यांच्या मर्यादेत असतो. मात्र एकूण वास्तवदर्शी विमा हप्ता ३५ टक्क्यांहून अधिक असल्यास त्या अधिक विमा हप्त्यातील ५० टक्के भार शेतकऱ्यांना उचलावा लागतो. विमा हप्ता दर जिल्हा निहाय वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे शेतकऱ्याने भरवायच्या विमा हप्त्यात जिल्हानिहाय फरक असू शकतो. गारपीट या हवामान धोक्यापासून आंबिया बहरामधील फळपिकांना विमा संरक्षण दिले जाते. त्यासाठी वरील नियमित विमा व्यतिरिक्त वेगळा विमा हप्ता बँकेत भरावा लागतो. या योजनेत राज्यात प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरिता एका फळपिकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हेक्टर) आणि उर्वरित विभागासाठी कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र २० गुंठे (०.२० हेक्टर) अशी मर्यादा राहील. जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रती शेतकरी ४ हेक्टर मर्यादेपर्यंत राहील. सदर फळपीक विमा योजनेतील शेतकऱ्यांनी ई - पीक पाहणी करणे अनिवार्य आहे. विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळण्यासाठी शेतकऱ्याचे बँक खाते आधार आधारित पेमेंटसाठी लिंक असावे. भाडे पट्टीने शेती करत असल्यास भाडे करार नोंदणीकृत असावा.शेतकऱ्यांसाठी ऑनलाइन हप्ता भरण्यासाठी विमा पोर्टल ु.षिलू.र्सी.ळप या विमा योजनेअंतर्गत हवामान धोक्याच्या ट्रिगर कार्यान्वित झाल्यास त्या महसुल मंडळातील त्या पिकासाठी भाग घेतलेल्या शेतकऱ्यास नुकसान भरपाई रक्कम संबंधित विमा कंपनीकडून देण्यात येणार आहे.

# परळीच्या नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी ठरल्या धुरंधर

परळी। प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीमध्ये परळी वैजनाथ नगरपरिषदेची निवडणूक वैशिष्ट्यपूर्ण निवडणूक ठरली आहे. या निवडणुकीला वेगवेगळ्या पैलूंची वेगवेगळी वैशिष्ट्ये असल्याचे बघायला मिळते. या अनुषंगानेच अतिशय अधोरेखित होणारी आणि वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे या निवडणुकीत नगराध्यक्षा म्हणून जनतेतून निवडून आलेल्या सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी या बीड जिल्ह्यातील सर्व नगरपालिकांमध्ये निवडून आलेल्या नगराध्यक्षांच्या तुलनेत सर्वाधिक मताधिक्य घेऊन विजयी झालेल्या नगराध्यक्षा ठरल्या आहेत. प्रतिस्पर्धी उमेदवारांपेक्षा १५६६२ इतके मताधिक्य घेत बीड जिल्ह्यातील निवडून आलेल्या नगराध्यक्ष मताधिक्यात सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी ''धुरंधर'' ठरल्या आहेत.



परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत ना. पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महायुती झालेली परळी नगर परिषद ही एकमेव नगरपालिका होती. या ठिकाणी राज्यस्तरावरील महायुतीतील सर्वच घटक पक्ष यांना एकत्रित आणण्यात या दोन्ही नेतृत्वाला यश मिळाले. त्याचबरोबर परळीचे नगराध्यक्ष पद हे महिला प्रवर्गासाठी राखीव झाले. यासाठी उमेदवार कोण असणार याची उत्सुकता होती. परंतु जनतेतून उत्स्फूर्तपणाने आलेल्या सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या नावावरच शिक्कामोर्तब झाले. अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण ही निवडणूक झाली. सुरुवातीपासूनच ही निवडणूक नगराध्यक्ष पदासाठी एकतर्फी आहे असेच चित्र होते. घडलेही त्याच पद्धतीने. निवडणूक निकाल आल्यानंतर सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचे मताधिक्य हे प्रतिस्पर्धी उमेदवारापेक्षा १५६६५ इतके आहे. बीड जिल्ह्यामध्ये एकूण सहा नगरपरिषदेच्या निवडणुका झाल्या. यामध्ये बीड, गेवराई ,माजलगाव ,अंबाजोगाई, धारूर व परळी वैजनाथ या नगरपरिषदांचा समावेश होता. निवडणूक निकालानंतर अंबाजोगाई नगर परिषदेत नगराध्यक्ष पदावर विजयी झालेले नंदकिशोर मुंदडा हे २४९७ मताधिक्याने विजयी झाले आहेत. गेवराई येथील नगराध्यक्ष गीताकाकी बाळराजे पवार या ५०५४ एवढ्या मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. माजलगाव नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार महेरील चाऊस या २९२३ मताधिक्य घेऊन विजयी झाल्या आहेत. बीड येथील नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलता पारवे या ३७७९ मताधिक्य घेऊन विजयी झाल्या आहेत तर धारूर येथील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बालासाहेब जाधव हे ६६९ इतके मताधिक्य घेऊन विजयी झाले आहेत. या सर्वांमध्ये परळीच्या नगराध्यक्षा सौ .पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांचे मताधिक्य हे १५६६२ इतके आहे. या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण विचार केला तर परळीच्या नगराध्यक्षा सौ . पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी या बीड जिल्ह्यात सर्वाधिक मताधिक्य घेऊन नगराध्यक्षांमधील ''धुरंधर'' नगराध्यक्षा ठरल्या आहेत.

# भोकरदन तहसीलमध्ये पोतराज आंदोलन

## मंगेश साबळे यांनी आंदोलन करून वेधून घेतले सर्वांचे लक्ष



भोकरदन। प्रतिनिधी

वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये विहिरींच्या कामाचे स्थगित करण्यात आलेले मस्टर सुरू करून त्यांना तत्काळ पेमेंट सुरू करण्याच्या मागणीसाठी भोकरदन येथील तहसील कार्यालयात उपोषण सुरू आहे. दरम्यान, या आंदोलनाचा एक भाग म्हणून फुलंब्री येथील सामाजिक कार्यकर्ते मंगेश साबळे यांनी डफ वाजवत पोतराज होऊन तहसील कार्यालयात आंदोलन केले. या आंदोलनाने अनेकांचे लक्ष वेधले.

भोकरदन येथे मागील पाच दिवसांपासून तहसील कार्यालयाच्या प्रांगणात नारायण लोखंडे व विकास जाधव यांचे आमरण उपोषण सुरू आहे. त्यांच्या उपोषणाला पाठींबा म्हणून मंगेश साबळे यांनी पोतराज होऊन आंदोलन केले. दरम्यान, या आंदोलनानंतर भोकरदनचे गटविकास अधिकारी एस. एस. वेणीकर यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले. या वेळी भोकरदनचे तहसीलदार ज्ञानेश्वर काकडे यांचीही उपस्थिती होती.

# दानापूर ग्रामसभेत ग्रामपंचायतीने घेतली ५० % घरपट्टी

## पाणीपट्टी माफीचा निर्णय,तब्बल २ वर्षांनंतर घेण्यात आली ग्रामसभा

दानापूर। प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील दानापूर ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत ५० टक्के घरपट्टी आणि पाणीपट्टी माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालयासमोर झालेल्या या सभेला १०० हून अधिक नागरिक उपस्थित होते. तब्बल दोन वर्षांनंतर ग्रामसभा होत आहे. शासनाने ग्रामपंचायतींच्या करवसुलीला गती देण्यासाठी ही सवलत योजना जाहीर केली आहे. घरपट्टी, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करावर एकरकमी भरल्यास ५० टक्के सवलत मिळणार आहे. ही योजना ३१ डिसेंबरपर्यंतच लागू राहणार आहे. जिल्हा परिषदांना अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये करवसुली अपुरी असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात, विकासकामांसाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी ही योजना राबवली जात आहे. थकीत कराची एकरकमी वसुली झाल्यास ती रक्कम थेट विकासकामांसाठी वापरता येणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना मोहिमेचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रत्येक




ग्रामपंचायतीत ही योजना प्रभावीपणे राबवली जाणार आहे. दरम्यान, ग्रामपंचायतींना निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींनी अंमलबजावणी सुरू केली आहे. हजारो रुपयांची थकबाकी असलेल्या ग्रामपंचायतींना या निर्णयामुळे दिलासा मिळणार आहे.कर वसुली न झाल्यास वरिष्ठ अधिकारी कारवाई करत असल्याने ग्रामसेवकांवर ताण येत होता. कोट्यवधी रुपयांची थकबाकी असलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना या निर्णयाचा मोठा लाभ होणार आहे. पूर्वीच्या थकबाकीत ५० टक्के सवलत शासनाची ही योजना लागू करायची की नाही याचा अंतिम निर्णय माफीचा निर्णय सर्वस्वी ग्रामसभेवर अवलंबून आहे. दानापूर ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामसभेत हा निर्णय घेतला असून नागरिकांकडूनही प्रतिसाद मिळत आहे. ही योजना सन २०२५-२६ म्हणजे चालू वर्षाचा पूर्ण कर एकरकमी भरावा लागेल. एक एप्रिल २०२५ पूर्वीची थकबाकीमध्ये ५० टक्के सवलत राहील. उर्वरित पन्नास टक्के रक्कम एकरकमी भरावी लागेल. ग्रामपंचायतीने विशेष ग्रामसभा लावून निर्णय घेतला व गावकऱ्यांनी मोठ्या संख्येने यात सहभाग घेतला. यातून थकबाकीदारांनी आपल्या पैशाची सुद्धा बचत करावी व आपल्या कडे असलेले बाकी भरून सहकार्य करावे.

# वीजपुरवठ्याच्या समस्येने शेतकऱ्यांवर रात्री जागण्याची वेळ

## सिंचनासाठी संघर्ष, वीरेगाव परिसरात थ्रीफेजसाठी रात्रीच होतोय वीजपुरवठा

वीरेगाव। प्रतिनिधी

खरीप हंगामात शेतकऱ्यांनी कापूस आणि सोयाबीन पिकावर जिवापाड मेहनत घेतली. मात्र, अतिवृष्टीमुळे त्यांच्या हातात काहीच आले नाही. खरिपात झालेला तोटा भरून काढण्यासाठी शेतकरी रब्बी हंगामाच्या तयारीला लागले आहेत. यंदा अतिवृष्टीमुळे परिसरातील विहिरींमध्ये मुबलक पाणीसाठा आहे. तरीही विजेअभावी सिंचनासाठी धडपड करावी लागत आहे. दरम्यान, शासनाने दिवसा वीज देण्याचे आश्वासन दिले. मात्र, अद्यापही रात्री पाणी देण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांची आर्थिक मदार खरीप हंगामावर अवलंबून असते. गेल्या काही वर्षांपासून एकही हंगाम शेतकऱ्यांना साथ



देत नाही. परिणामी, कर्जाचा डोंगर कमी होण्याऐवजी वाढत चालला आहे. निराशा झटकून शेतकरी प्रत्येक हंगामात मेहनत करून उत्पन्न काढण्यावर भर देत आहेत. यंदा अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. त्यातून वाचलेले सोयाबीन हाती आले. पहिल्या कापसाच्या वाती झाल्या तर वेचणीला महाग झाला आहे. आता रब्बीसाठी मिळेल त्या भावात सोयाबीन विक्री करावी लागत आहे. दुसरीकडे, सिंचनाची सुविधा असणारे शेतकरी हरभरा, गहू, कापूस, तुर पिकाला पाणी देण्याची धडपड करत आहेत. विद्युत असुविधेमुळे शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित विभागाने लक्ष देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. रबी हंगामासह खरीप हंगामातील पिकांना सिंचनाची सुविधा असणारे शेतकरी पिकांना पाणी देण्यावर भर देत आहेत. दुसरीकडे, दिवसा वीज मिळत नसल्याने रात्री शेतात जागरण करावे लागत आहे. दिवसा वीजपुरवठा करण्याची शेतकऱ्यांची मागणी सद्यस्थितीत एक आठवडा दिवसा आणि एक आठवडा रात्री असा वीजपुरवठा केला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर पुन्हा रात्री पाणी देण्याची वेळ आली आहे. रात्री पाळीत आमच्याकडे त्रिफेज वीज पुरवठा होतो. सध्या कापूस, तुर, गव्हाचे शेत भिजवणे चालू आहे. सध्या बिबट्या दिसल्याची चर्चा आहे. त्यामुळे जीव मुठीत धरून रात्र काढावी लागत आहे. त्यात साप, विंचू आदींचा सामना करत रात्रीच्या वेळेस पाणी द्यावे लागते, असे शेतकरी चंद्रकांत गुंजाळ यांनी सांगितले.

# गिरिजा नदीवरील कोल्हापुरी बंधारे तुडुंब

संभाजीनगर । प्रतिनिधी

फुलंब्री तालुक्यातील सर्वात मोठी नदी म्हणून ओळख असलेली गिरिजा नदी मागील सहा महिन्यांपासून सातत्याने प्रवाहित असून, नदीवरील सर्व कोल्हापुरी बंधारे तुडुंब भरून ओसंडून वाहत आहेत. यामुळे परिसरातील हजारो शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा लाभ होत आहे.

यावर्षी परिसरात झालेल्या जोरदार पावसामुळे मे महिन्यातच गिरिजा नदीला पूर आला होता. पावसाळ्याच्या सुरुवातीपासून नदीच्या पात्रात मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असून, डिसेंबर अखेरपर्यंतही गिरिजा नदी खळखळून वाहत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. सप्टेंबर महिन्यात गिरिजा नदीवरील पाथ्री, कविटखेडा, भालगाव, वडोद बाजार, वडोद खुर्द व शेवता आदी ठिकाणच्या सर्व कोल्हापुरी बंधाऱ्यांचे दरवाजे टाकण्यात आले होते. त्यामुळे पाथ्री शिवारापासून ते बोरगावपर्यंत नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाणी साठले असून, बंधाऱ्यांवरून पाणी ओसंडून वाहत आहे. या साठवलेल्या पाण्याचा थेट फायदा परिसरातील शेतकऱ्यांना होत आहे. गहू, मका, बाजरी आदी रब्बी पिकांसाठी मुबलक पाणी उपलब्ध झाले आहे. कपाशीचे पीक काढल्यानंतर अनेक शेतकरी आता मका व बाजरीसारखी पिके घेताना दिसून येत आहेत. याशिवाय, नदीपात्रालगत असलेल्या शेतांमधील विहिरींच्या पाण्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. मागील सहा महिन्यांपासून गिरिजा नदीत सातत्याने पाणी वाहत असल्याने भूजल पातळी उंचावली आहे. त्यामुळे आगामी काळात शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिलासा मिळणार आहे.

# नायगावात हॉटेल मालकाची निर्घृण हत्या

लातूर। प्रतिनिधी

चाकूर तालुक्यातील नायगाव येथे हॉटेल मालकाची काठीने डोक्यात प्रहार करून हत्या करण्यात आली. बी.एन. बार अँड रेस्टॉरंटचे मालक गजानन नामदेव कासले असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेत अन्य एक जण गंभीर जखमी झाला असून, अज्ञात आरोपींनी बारमधील रोख रक्कम आणि दारूच्या बाटल्या घेऊन पलायन केले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री ३ अज्ञात तरुण नायगाव येथील बी.एन. बारमध्ये आले. त्यांनी हॉटेल मालक गजानन कासले यांच्याकडे दारू आणि सिगारेटची मागणी केली. मालकाने नकार दिला असता, आरोपींनी शिवीगाळ करत त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपींनी कासले यांच्या डोक्यात काठीने सपासप वार केले. या भीषण हल्ल्यात गजानन कासले यांचा जागीच मृत्यू झाला. केवळ हत्या करूनच हे आरोपी थांबले नाहीत, तर त्यांनी हॉटेलमधील अजय भरत मोरे यांनाही काठीने मारहाण करून गंभीर जखमी केले. बारमधील टीव्हीचीही त्यांनी तोडफोड केली. कॅश काउंटरमधील अंदाजे १५ हजार रुपये आणि विदेशी दारूच्या बाटल्याही त्यांनी चोरून नेल्या. घटनेची माहिती मिळताच चाकूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, त्याआधारे पोलीस आरोपींची ओळख पटवण्याचे काम करत आहेत. पोलीस निरीक्षक बालाजी भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथके तयार करण्यात आली असून आरोपींचा शोध घेतला जात आहे. भरवस्तीत घडलेल्या या प्रकारामुळे नायगाव आणि चाकूर परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. मृत गजानन कासले यांचे भाऊ बालाजी कासले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तीन अज्ञात व्यक्तींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लवकरात लवकर आरोपींना अटक करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# सारंगवाडीच्या सरपंचांना ग्रामसभेने केले पायउतार

## दुसऱ्यांदा बोलावलेल्या ग्रामसभेत गावकऱ्यांचा अविश्वास कायम

हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ तालुक्यातील सारंगवाडी येथील सरपंचाच्या अविश्वास प्रस्तावासाठी बोलावण्यात आलेल्या ग्रामसभेत ५२५ पैकी ३१६ गावकऱ्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान करून सरपंचांना पदावरून पायउतार केले आहे. विशेष म्हणजे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शुक्रवारी ता. २६ दुसऱ्यांचा ग्रामसभा पार पडली आहे. औंढा नागनाथ ग्रामपंचायतीचे सरपंच प्रभूलिंग महाराज यांच्या विरोधात ९ ग्रामपंचायत सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. त्यानंतर झालेल्या बैठकीत सदस्यांनी दाखल केलेला अविश्वास ठराव पारित झाला होता. त्यानंतर सरपंच प्रभूलिंग महाराज यांनी जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात अपील दाखल केले. मात्र त्यांची निवड थेट जनतेतून झाल्यामुळे ग्रामसभा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार यापुर्वी ग्रामसभा घेण्यात आली. त्यावेळी ग्रामसभेने सरपंच प्रभूलिंग महाराज यांच्या वरील अविश्वास ठराव बहुमतान पारित केला.

या ग्रामसभेच्या निर्णया विरुध्द त्यांनी उच्च न्यायालयात रिट याचीका दाखल केली होती. यामध्ये न्यायालयाने त्यांना दिलासा दिला होता.



मात्र पुन्हा एकदा ग्रामसभा घेण्याचे आदेश न्यायालयाने जिल्हा प्रशासनाला दिले होते. त्यानुसार शुक्रवारी ता. २६ सारंगवाडी येथे विशेष ग्रामसभा बोलाविण्यात आली. यावेळी औंढा नागनाथ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोपाल कल्हारे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सुनील गुठ्ठे, एस. एस. बोबडे, गोपाल मुकीर, एश. एस. शामशेट्टीवार, जी. पी. हलबुर्गे याच्यासह ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. यावेळी ग्रामसभेत मतदानासाठी शुक्रवारी सकाळी १० वाजेपर्यंत नोंदणी करून घेण्यात आली. यामध्ये ५४४ गावकऱ्यांनी मतदानासाठी नोंदणी केली होती. त्यानंतर दुपारी बारा ते सायंकाळी पाच यावेळेत प्रत्यक्ष मतदान घेण्यात आली. त्यासाठी जिल्हा परिषद शाळेच्या खोलीत मतदान केंद्र स्थापन करण्यात आले. यामध्ये सायंकाळी पाच वाजेपर्यंत ५२५ जणांनी मतदान केले तर १९ जण अनुपस्थित होते. अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदानासाठी वर्तुळ हि निशाणी तर विरोधात मतदानासाठी त्रिकोण हि निशाणी देण्यात आली होती.

दरम्यान, मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी मतमोजणीला सुरवात झाली. गावकऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या मतमोजणीमध्ये अविश्वास ठरावाच्या बाजूने ३१६ गावकऱ्यांनी मतदान केले तर १८२ गावकऱ्यांनी विरोधात मतदान केले. तर २७ मते बाद झाली. सायंकाळी उशीरा निर्णय जाहिर होताच गावकऱ्यांनी एकच जल्लोष केला. दुसऱ्यांचा झालेल्या ग्रामसभेतही गावकऱ्यांनी सरपंच प्रभूलिंग महाराज यांना नाकारले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आदेशानंतर घेण्यात आलेल्या ग्रामसभेची प्रक्रिया कुठल्याही त्रुटी राहू न देता पार पाडण्यात आली. आता याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेला कळविला जाणार असल्याचे गटविकास अधिकारी गोपाल कल्हारे यांनी सांगितले.

# भिंगी येथील तरुण अभियंत्याचा नागपूर येथे अपघाती मृत्यू

## आठ महिन्यापुर्वीच नागपूर मनपाचा झाला होता रूजू, गाववर शोककळा

हिंगोली। प्रतिनिधी

हिंगोली तालुक्यातील भिंगी येथील तरुण अभियंत्याचा नागपूर येथे अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. शनिवारी ता. २७ सकाळी मृतदेहावर नागपूर येथील रुग्णालयात उत्तरीय तपासणी करण्यात आली आहे. मयत अभियंता तेजस निमदेव (२५) हा आठ महिन्यापुर्वीच अभियंता नागपूर मनपाच रुजू झाला होता. या घटनेमुळे निमदेव कुटूंबासह गावावर शोककळा पसरली आहे.याबाबत सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली तालुक्यातील मुळचे भिंगी येथील रहिवासी असलेले शिक्षक बालासाहेब निमदेव कुटुंबिय मागील काही वर्षापासून हिंगोली येथील बळसोंड भागात राहतात. त्यांचा मुलगा तेजस निमदेव (२५) हा सुमारे आठ महिन्यापुर्वीच नागपूर महानगर पालिकेत अभियंता पदावर रुजु झाला होता.

दरम्यान, नागपूर येथे रूजू झाल्यानंतर तेजस याने व्यायामासाठी जीम लावली होती. नेहमी प्रमाणे सोमवारी ता. २२ पहाटे तो त्याच्या दुचाकी वाहनावर जीम कडे निघाला होता. यावेळी त्याचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी वाहन एका खांबावर जाऊन आदळले. या अपघातात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. यामध्ये अतिरक्तस्त्राव झाला. सदर अपघाताची माहिती मिळाल्यानंतर नागपूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन गंभीर जखमी झालेल्या तेजस यास उपचारासाठी रुग्णालयात हलविले. त्यानंतर त्याच्या कुटुंबियाशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. नागपूर येथील रुग्णालयात शस्त्रक्रिया देखील झाली. मात्र मागील दोन दिवसांत त्याची प्रकृती आणखीनच खालावली अन शुक्रवारी ता. २६ त्याचा मृत्यू झाला. मृतदेहावर नागपूर येथे शनिवारी ता. २७ उत्तरीय तपासणी करण्यात आली आहे. या घटनेमुळे निमदेव कुटूंबियांसह भिंगी गावावर शोककळा पसरली आहे. मयत तेजस याच्या पश्चात आई, वडिल एक भाऊ असा परिवार असल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांनी सांगितले.

# बीडमध्ये ज्वारी घोटाळ्याचा भांडाफोड!

## वंचितच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी जॉन्सन यांची तातडीची दखल, ज्वारी वितरणास ब्रेक!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या मालदांडी ज्वारीच्या दर्जाबाबत गंभीर संशय निर्माण झाला असून, ऋ-ट दर्जाची ज्वारी असल्याचा शासकीय दावा आणि प्रत्यक्षातील वस्तुस्थिती यात प्रचंड तफावत असल्याचे उघडकीस आले आहे. निकृष्ट, मानवी उपभोगास अयोग्य ज्वारी सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत (झऊड) वाटप करण्याचा प्रयत्न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.



जिल्हा पणन अधिकारी, बीड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार रब्बी पणन हंगाम २०२४-२५ मध्ये बीड जिल्ह्यातील ८ खरेदी केंद्रांवरून तब्बल ८९,९०५.५० क्विंटल ज्वारी खरेदी करण्यात आली. ही संपूर्ण ज्वारी ऋ-ट दर्जाची असल्याचे कागदोपत्री नमूद करण्यात आले होते. मात्र, या दाव्याची खातरजमा करण्यासाठी जिल्हा पुरवठा कार्यालयाने सब-एजंट व संस्थानिहाय स्वयंस्पष्ट अहवाल मागवले. त्या अहवालांच्या आधारे ज्वारी शासकीय गोदामात जमा असल्याचे दाखवून, पुढे झऊड मार्फत वितरणासाठी नियतन आदेश काढण्यात आले. प्रत्यक्षात मात्र ज्वारीचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे समोर आले.

ही बाब वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनतेसमोर आणताच प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली. दि. २४.१२.२०२५ रोजी सर्व लोकप्रिय दैनिक वृत्तपत्रांत ज्वारी निकृष्ट व मानवी उपभोगास अयोग्य अशा ठळक बातम्या प्रसिद्ध केलंल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले. जिल्हा पुरवठा कार्यालयाने तत्काळ जिल्हा पणन अधिकाऱ्यांकडे अहवाल मागवला , मात्र आजतागायत कोणताही स्पष्ट व समाधानकारक अहवाल सादर झालेला नाही, ही बाब अधिक संशयास्पद ठरत आहे.

दरम्यान, अजय सरवदे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची प्रत्यक्ष भेट घेत निकृष्ट ज्वारीचे पॅकेट त्यांच्या समोर सादर केले. प्रत्यक्ष पाहणी आणि प्रात्यक्षिकानंतर प्रकरणाची गंभीरता लक्षात घेत दि. २६.१२.२०२५ रोजी मा. जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी ज्वारी वितरण तात्काळ स्थगित करण्याच्या सूचना दिल्या.

मात्र, जर ज्वारी खरोखरच ऋ-ट दर्जाची होती, तर वितरण थांबवण्याची वेळ का आली?, निकृष्ट ज्वारी झऊड मधून वाटप करण्याचा प्रयत्न कुणाच्या आशीर्वादाने झाला?, शासन निधी, शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांवर कारवाई कधी होणार? या संपूर्ण प्रकरणामुळे अन्नधान्याच्या गुणवत्तेबाबत प्रशासकीय दुर्लक्ष, संशयास्पद पान ३ वर

### वंचितचे नागरिकांना आवाहन सजग रहा, भ्रष्टाचार रोखा!

बीड जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत (झऊड) मालदांडी ज्वारी वितरित केली जात असून, तिचा दर्जा अत्यंत निकृष्ट व मानवी उपभोगास अयोग्य आहे. ही ज्वारी खाणे म्हणजे हळूहळू विष सेवन करण्यासारखे असून, इतकी घाणेरडी आहे की पक्षांनाही खाण्यायोग्य नाही, अशी परिस्थिती आहे.हा प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून, थेट भ्रष्टाचार आणि जनतेच्या जीवाशी खेळ आहे. आपण जर आज आवाज उठवला नाही, तर उद्या हा भ्रष्टाचार अधिक बळावेल. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने स्पष्ट आवाहन आहे की, जनतेच्या आरोग्याशी खेळ करणारी ही ज्वारी कोणीही घेऊ नये. सजग नागरिक बना अन्यायाविरुद्ध उभे रहा!

अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (पश्चिम)

# पाटोद्यात युरियाची जादा दराने विक्री

## कृषी गुणनियंत्रण निरीक्षकाचे दुर्लक्ष; शेतकऱ्यांतून चौकशीची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांवर युरियाची जादा दराने विक्री सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, याकडे कृषी गुणनियंत्रण निरीक्षकांचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शेतकरी बांधवांकडून केला जात आहे. शासनाने तालुक्यातील कृषी सेवा केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुका कृषी कार्यालयातील मंडळ अधिकाऱ्यांची पूर्णवेळ गुणनियंत्रण निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. मात्र प्रत्यक्षात या निरीक्षकांकडून आवश्यक ती कारवाई होत नसल्याने व्यापाऱ्यांना मोकळे रान मिळाले असल्याचे चित्र आहे.**

तालुक्यात यापूर्वी बियाण्यांची जादा दराने विक्री होत असल्याच्या तक्रारी होत्या. आता त्यात युरियाचाही समावेश झाला असून, शेतकऱ्यांना शासननिर्धारित दरापेक्षा अधिक पैसे मोजावे लागत आहेत. यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर अतिरिक्त भार पडत आहे.

शेतकरी बांधवांचे म्हणणे आहे की, कृषी दुकानांवर नियमित तपासणी व दरपत्रकाची अंमलबजावणी होत नसल्यामुळे हा प्रकार सर्रास सुरू आहे. गुणनियंत्रण निरीक्षकांच्या हलगर्जीपणामुळेच जादा दराने विक्रीला आळा बसत नसल्याचा आरोपही शेतकऱ्यांकडून केला जात आहे. या प्रकरणी बीड जिल्हाधिकारी तसेच जिल्हा कृषी अधिकारी यांनी तात्काळ लक्ष घालून पाटोदा तालुक्यात सुरू असलेल्या युरियाच्या जादा दराने विक्रीची सखोल चौकशी करावी, तसेच दोषी आढळणाऱ्या कृषी सेवा केंद्रांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# आष्टी नगरपंचायतने कार्य तत्परता दाखवत हिंसक वेड्याची रवानगी केली येरवडा कारागृहात

आष्टी । प्रतिनिधी

शहरातील शांतता आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या एका हिंसक वेड्याबाबत नगरपंचायतीने तातडीची आणि जबाबदार भूमिका घेत ठोस कारवाई केली आहे. संबंधित व्यक्तीच्या वारंवार होणाऱ्या हिंसक वर्तनामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांकडून मिळालेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत नगरपंचायत प्रशासनाने तत्काळ हालचाली सुरू केल्या.



सदर व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्थिर असून सार्वजनिक ठिकाणी आक्रमक वर्तन करीत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी नगरपंचायतीने पोलीस प्रशासन व आरोग्य विभागाच्या समन्वयाने आवश्यक कार्यवाही केली. वैद्यकीय तपासणीनंतर संबंधित व्यक्तीला पुढील उपचार व सुरक्षिततेच्या दृष्टीने येरवडा कारागृहात पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. नगरपंचायतीच्या या तत्पर कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या त्रासाला अखेर आळा बसल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत आहे. शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये प्रशासन कोणतीही तडजोड करणार नाही, असे संकेत या कारवाईतून मिळाले आहेत.नगरपंचायत प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अशा प्रकारचे संशयास्पद किंवा धोकादायक वर्तन कुणाच्या निदर्शनास आल्यास तात्काळ संबंधित यंत्रणेला कळवावे. शहरातील सुरक्षितता आणि शांतता राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आष्टी शहरातील व परिसरातील मुर्शदपुर भागातील नागरिकांनी आष्टी नगरपंचायतचे नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष नगरसेवक या सर्वांचे नगरपंचायत चे प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

# महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक महोत्सव समितीमध्ये राज्य महिला प्रतिनिधी मिनाक्षी देवकते

बीड । प्रतिनिधी

येथील बाणाई महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा तथा सामाजिक चळवळीतील धडाडीच्या कार्यकर्त्या मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांना महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक महोत्सव समितीमध्ये बीड येथील सामाजिक कार्यकर्त्या मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर, प्रमुख, महाराजा यशवंतराव होळकर (प्रथम) राज्याभषेक महोत्सव समती किल्ले वाफगाव, ता.खेड यांनी बीड येथील बाणाई महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांच्या सामाजिक चळवळीतील कार्याची दखल घेवून त्यांना महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक महोत्सव समितीमध्ये निवड केल्याचे



पत्र त्यांना नुकतेच प्राप्त झाले आहे. या निवडीमुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# आष्टीतील हॉटेल-धाब्यावर अवैध दारूचा सुळसूळाट

## आष्टी पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील महामार्गावरील हॉटेल आणि धाबे सध्या तळीरामांनी गजबजलेले असतात. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध दारूचा सुळसुळाट चालू असून यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक जण येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांना त्रास देतात. तर काहीजण सुसाट वाहने चालवून समोरच्या वाहनातील प्रवाशांना धोका निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. आष्टी पोलीस मात्र या प्रकाराकडे दुर्लक्ष करीत असून पोलिसांचे खिसे गरम होतात त्यामुळेच याकडे लक्ष दिले जात नाही अशी चर्चा नागरिक करत आहेत.

आष्टी तालुक्यातून बीड, नगर, कर्जत, धामणगाव आदी रस्ते जातात. या रस्त्यावर अनेक हॉटेल आणि धाबे चालू आहेत. या ठिकाणी राज्य उत्पादन शुल्क विभागाची परवानगी नसतानाही मोठ्या प्रमाणात दारू विक्री चालू असून तळीरामांना या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दारू मिळत असल्याने परिसरातून हॉटेल ढाब्यावर तळीराम गर्दी करतात. हे तळीराम दारू पिल्यानंतर सुसाट वेगाने वाहने चालवून समोरच्या प्रवाशांना धोका निर्माण होईल असे वागतात. तर काही प्रवाशांना शिवीगाळ करणे, त्यांच्या गाड्या अडवणे, चौकाचौकांत धिंगाणा




घालणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून या प्रकाराला आळा घालण्यासाठी आष्टी पान ३ वर

# ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांचा गौराई पत्रकार संघाच्या वतीने सन्मान

गेवराई । प्रतिनिधी

ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांची कन्या कु. सोनालीताई सुभाष सुतार ह्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये बहुमताने विजय झाल्याने पत्रकार सुभाष सुतार यांचा गौराई पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार सुभाष सुतार म्हणाले की, हा सन्मान माझ्यासाठी घरचा असून याचे मूल्य खूप मोठे असून मी सर्व पत्रकार बांधवांचा ऋणी आहे.

गेवराई नगर परिषदच्या वतीने एकमेव पत्रकारांना नगरसेवक पदाचे उमेदवारी भाजपच्या वतीने



देण्यात आली होती. यामध्ये ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांचा समावेश असून त्यांची कन्या कु. सोनालीताई सुभाष सुतार ह्या प्रभाग क्र. ८ अ मधून उभ्या होत्या. या निवडणुकीमध्ये प्रचंड मताने त्यांचा विजय झाला असल्याने त्यांच्या वडिलांचा ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांचा वतीने गौराई पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी ते सत्कारास उत्तर देताना म्हणाले की, हा सन्मान माझ्यासाठी खूप मोठा असून हा घरचा सन्मान आहे. मी सर्व पत्रकारांचा ऋणी आहे असे ते म्हणाले. यावेळी जेष्ठ पत्रकार सुनील पोपळे, गौराई पत्रकार संघाचे अध्यक्ष अंकुश आतकरे, भागवत देशपांडे, प्रदीप नाना जोशी, राजेंद्र नाटकर, बाळासाहेब नाटकर, शिवनाथ काळे, प्रियंका पाटणी, कैलास हातगुले, तुळशीराम वाघमारे , विष्णू राठोड, बापू गाडेकर, भागवत जाधव, प्रसाद कुलकर्णी, पिंपळे सर सह गणेश गोरे, समीर पान ३ वर

# दोन जिल्हा परिषद व चारही पंचायत समित्या ताब्यात आणण्याचा भाजपाचा बैठकीत निर्धार

वडवणी । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेला उमेदवार कोण आहे याचा विचार न करता उमेदवार कमळाचा आहे, म्हणजे तो आपलाच आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने हा निश्चय मनात पक्का करा तरच निश्चितपणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये भाजपाचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही असे ठाम प्रतिपादन भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी वडवणी येथील जिल्हा परिषद व पंचायत समिती इच्छुक उमेदवारांच्या बैठकीत करण्यात आले.



जि.प.व.प.सं इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्वीकारले

पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या आदेशानुसार वडवणी तालुक्यातील दोन जिल्हा परिषद गट व चार पंचायत समिती गणाच्या इच्छुक उमेदवारांची अर्ज स्वीकारण्याची बैठक भाजपा कार्यालयात पार शुक्रवारी पडली आहे. पुढे बोलताना जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख म्हणाले की, जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीत पक्षाची सत्ता असणे हे केवळ पदापुरते मर्यादित नसून, त्याचा थेट लाभ तळागाळातील कार्यकर्त्याला मिळतो. आपल्या भागाचा आणि आपल्या पक्षाचा जिल्हा परिषद सदस्य असल्यामुळे कार्यकर्ता सन्मानाने गावात वावरतो आणि संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होते. त्यामुळे जिल्हा परिषद तसेच पंचायत समित्या ताब्यात आणणे हेच अंतिम उद्दिष्ट ठेवून काम करण्याचे आवाहन करण्यात आले.वडवणी तालुक्यातील चारही पंचायत समित्या आपल्या ताब्यात याव्यात, असा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला. पान ३ वर

# महात्मा फुले युवा दलातर्फे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. ना. जयकुमार (जयभाऊ) गोरे यांचा महात्मा फुले युवा दलाच्या वतीने बीड येथे भव्य सत्कार करण्यात आला. दि. ३ जानेवारी २०२६ रोजी नायगाव येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्सव सोहळ्याच्या तसेच ₹१४३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले स्मारकाच्या भूमिपूजन समारंभाच्या नियोजनासंदर्भात चर्चा करण्यासाठी मंत्री जयकुमार गोरे बीड येथे आले होते.

यावेळी बोलताना मंत्री जयकुमार गोरे यांनी नायगाव येथे होणाऱ्या या ऐतिहासिक कार्यक्रमास महाराष्ट्रातील सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे पान ३ वर



# कानडी घाट येथे भुरट्या चोरांकडून टपरीत चोरी

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा परिसरा लगत असलेल्या कानडी घाट येथे शुक्रवारी सायंकाळी चोरीची घटना घडली आहे. येथील रहिवासी सोपान तुळजीराम शेंडगे (वय ७४) यांच्या टपरीतून अज्ञात चोरट्यांनी एक चॉकलेटची भरणे व रोख सहाशे रुपये असा एकूण ८५० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.

शेंडगे यांची कानडी घाट येथे लहान टपरी असून, शुक्रवारी सायंकाळी नेहमीप्रमाणे टपरीच्या पाठीमागे असलेल्या आपल्या घराकडे गेले होते. अगदी तेवढ्या वेळेत काही अज्ञात भुरट्या चोरट्यांनी डाव साधला. सोपान तुळशीराम शेंडगे हे पती-पत्नी सदरील टपरीच्या पाठीमागे आपल्या घरामध्ये राहत असून त्यांना फक्त एक एकर शेत जमीन आहे वय झाल्यामुळे शेतातही काम होत नाही म्हणून शेतात निघेल तेवढे उत्पन्न आणि आपली उपजीविका भागवण्यासाठी आपल्या घरासमोर छोटी टपरी टाकून त्यामध्ये चॉकलेट, गोळ्या, बिस्किट, वेफर्स साहित्यसह ते छोटासा व्यवसाय करत आहेत. चोरीची घटना जरी किरकोळ असली तरी सदरील रक्कम ही पीडित शेंडगे परिवारासाठी खूप मोठे आहे.

सदरील पान ३ वर

# बीड शहरामध्ये दुचाकींची ठो-ठो चालूच; शहर वाहतूक शाखा सुस्तावली

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरामध्ये दुचाकी वाहनांचा ठो-ठो चा आवाज पुन्हा सुरू झाला असून मध्यंतरीच्या काळामध्ये वाहतूक शाखेने मोहीम राबवल्याने बऱ्याच प्रमाणात यावर आळा बसला होता. मात्र आता ही यंत्रणा सुस्तावल्याने पुन्हा दुचाकीचा ठो - ठो आवाज सुरू झाला असून ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होताना दिसत आहे.

बीड शहरामध्ये सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स परिसरात सायंकाळच्या वेळी अनेक ज्येष्ठ नागरिक येऊन या ठिकाणी विसावा घेतात. महात्मा फुले पुतळ्याच्या परिसरामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था केल्याने या ठिकाणी अनेक जण गप्पा मारायला येत असतात. मात्र आता त्यांना विरंगुळा मिळण्याऐवजी या दुचाकी वाहनांच्या ठो-ठो चा आवाज सहन करून त्रास जाणवत असल्याने अनेकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मध्यंतरीच्या काळात शहर वाहतूक शाखेने या ठो-ठो आवाजावर बऱ्याच प्रमाणात आळा घातला होता. मात्र ही यंत्रणा सुस्त झाल्याने आता पुन्हा हे मस्तावलेले दुचाकी स्वार रस्त्यावरून जाताना कर्णकर्कश आवाज करत जातात आणि नागरिकांना त्रास देण्याच्या हेतूनेच हे आवाज वाढवतात. रस्त्यावरून जाताना सुसाट वेगाने चालतात. त्यामुळे अनेक महिला आणि ज्येष्ठ नागरिक भयभीत होतात. या अशा मस्तावलेल्या दुचाकी स्वारांवर आळा घालावा आणि यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी जेष्ठ नागरिक करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत पार पाडा-डॉ. हर्षदीप कांबळे यांचे आवाहन

**लोणीकंद । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या मूल्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत व शिस्तबद्धरीत्या पार पाडणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी प्रशासन, सामाजिक संघटना आणि नागरिकांनी परस्पर समन्वय साधत प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले.

हवेली तालुक्यातील पेरणे फाटा येथील विजयस्तंभ परिसरास भेट देऊन १ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने विविध विभागांकडून करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)चे महासंचालक सुनील वारे, समाजकल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, पोलीस अधीक्षक संदीप गिल, पुणे शहर पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, उत्पादक शुल्क अधीक्षक अतुल कानडे, समाजकल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता अनुराधा भंडारे, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, गट विकास अधिकारी शेखर शेलार, बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड तसेच विजयस्तंभ स्मारक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



डॉ. कांबळे म्हणाले की, देशभरातून लाखो अनुयायी १ जानेवारी रोजी विजयस्तंभास अभिवादनासाठी येतात. यंदा गेल्या वर्षीपेक्षा गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने आवश्यक सोयी-सुविधांचे काटेकोर नियोजन करावे. येणाऱ्या अनुयायांना कोणतीही अडचण येणार नाही, याची खबरदारी घेत सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विविध विभागांकडून सादर करण्यात आलेल्या मागण्यांबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे प्राप्त प्रस्तावांना आजच मान्यता दिली जाईल, तसेच आणखी काही मागण्या असल्यास तातडीने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विजयस्तंभास दिलेल्या भेटीस सन २०२७ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत आहेत. या पार्श्वभूमीवर भविष्यात अनुयायांची वाढती संख्या लक्षात घेता दीर्घकालीन नियोजन आणि पायाभूत सुविधांची तयारी आतापासूनच करावी, असेही डॉ. कांबळे यांनी स्पष्ट केले.

सर्वंकष पूर्वतयारीचा आढावा बैठकीत विविध विभागांकडून करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीची माहिती देण्यात आली. यामध्ये विजयस्तंभ सजावट, रुग्णवाहिका, आरोग्य केंद्र व औषधसाठा, रुग्णालयांतील खाटांचे आरक्षण, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचे टँकर, घंटागाडी, हिरकणी कक्ष, बसेसचे नियोजन, विद्युत व्यवस्था, पुस्तक विक्री स्टॉल, शौचालये, वाहनतळ, रस्ते दुरुस्ती, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण, पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही,

आपत्कालीन प्रतिसाद, समाजमाध्यमांचे सनियंत्रण, नियंत्रण कक्ष तसेच बिबट व सर्प प्राणी व्यवस्थापन यांचा समावेश आहे. याठिकाणी सुरू असलेल्या पूर्वतयारीबाबत समाधान व्यक्त करत ही माहिती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच सामाजिक न्याय मंत्र्यांना कळविण्यात येईल, असेही डॉ. कांबळे यांनी सांगितले..

# पुण्यात शिवसेनेचे शहराध्यक्ष संतापले, बैठकीतून तडकाफडकी बाहेर

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचे (चरहरश्रिळज्ञर एश्रशलींळेप) बिगुल वाजलं आहे. येत्या १५ जानेवारीला महापालिका निवडणुकांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सध्या पुण्यात अत्यंत नाट्यमय घडामोडी घडत आहेत.



पुण्यात भाजप आणि शिवसेना एकत्र लढणार असल्याची चर्चा सुरु आहे. अद्याप याबाबत तोडगा निघालेला नाही. दरम्यान, अशातच पुण्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत आज बैठकीदरम्यान मोठा राडा झाल्याची माहिती मिळत आहे. ही बैठक अर्धवट सोडून पुण्याचे शिवसेनेचे शहराध्यक्ष नाना भानगिरे हे बाहेर पडल्याचं पाहायला मिळालं. ते नाराज दिसत होते पण, त्यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. दरम्यान, नाना भानगिरे नाराज का होते? याची माहिती समोर आली आहे.

विजय शिवतारे, निलम गोऱ्हे यांनी आपल्या मर्जीचे उमेदवार देत होते, त्याला नाना भानगिरे यांनी विरोध केला होता. २५ लोकांची यादी विजय शिवतारे आणि निलम गोऱ्हे यांनी भाजपकडे दिली होती. मात्र, ३० ते ३५ उमेदवार देण्यात यावेत अशी मागणी नाना भांगरे यांनी भाजपकडे केली होती. मात्र, त्यालाही विजय शिवतारे आणि नीलम गोरे यांनी विरोध केला होता. मर्जीतील कार्यकर्त्यांनाच विजय शिवतारे यांनी उमेदवारी निश्चित केली आहे. त्यामुळं नाना नाना भानगिरे संतापले होते. त्यानंतर संतापून नाना भानगीरे बैठकीतून बाहेर पडल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. पुण्यात सुरुवातीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि भाजप एकत्र निवडणूक लढवणार असल्याचं खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलं होतं. पण भाजपकडून सन्मानजनक जागा मिळत नाही म्हणून शिवसेनेच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी नाराजी व्यक्त केली होती. सुरुवातीला नीलम गोऱ्हे यांनी भाजपकडे ६० जागांच्या मागणीचा प्रस्ताव पाठवला आहे. पण भाजप केवळ १२ जागा देणार असल्याची माहिती समोर आली होती. यामुळे महायुतीचं जागावाटप अद्याप निश्चित झालेलं दिसत नाही. असं असताना पुण्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत आज बैठकीदरम्यान मोठा राडा झाला आहे. शिवसेनेचे शहराध्यक्ष नाना भानगिरे आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते विजय शिवतारे यांच्यात बैठकीत मोठा वाद झाल्याची माहिती समोर येत आहे. नाना भानगिरे यामुळे भावूक झाल्याची माहिती आहे. बैठकीत वाद झाल्याने नाना भानगिरे हे तडकाफडकी बैठकीतून बाहेर पडले. विजय शिवतारे यांच्या मर्जीतल्या माणसांना उमेदवारी दिली जात असल्याचा आरोप नाना भानगिरे यांचा आहे.

# पोलीस भरतीसाठी निघालेल्या मित्रांवर काळाचा घाला; अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

पोलीस भरती प्रक्रियेसाठी दुचाकीवरून जात असलेल्या दोन मित्रांना पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एक युवक ठार, तर एक युवक गंभीर जखमी झाला. हा अपघात कोरेगाव भीमा (ता. शिरूर) येथील पुणे-नगर महामार्गावरील वाडागाव फाटा परिसरात घडला. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत युवकाचे नाव उबेद सलीम शेख (वय २२, रा. नागापूर एमआयडीसी, अहिल्यानगर) असे असून, गंभीर जखमी युवकाचे नाव शिवसागर अरुण आदिक (वय २१, रा. खानापूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उबेद शेख व शिवसागर आदिक हे दोघे मित्र दुचाकीवरून (एमएच १५ ईएल ८६८८) पोलीस भरती प्रक्रियेसाठी जात असताना, पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.

या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. त्यामध्ये उबेद शेख यांचा जागीच मृत्यू झाला, तर शिवसागर आदिक यांच्यावर उपचार सुरू आहेत. अपघातानंतर संबंधित अज्ञात वाहन चालक वाहनासह घटनास्थळावरून फरार झाला. याबाबत सलीम दस्तगीर शेख (वय ५१, रा. संगमनेर रोड, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे

# शिक्षिकेला सुरक्षारक्षकांकडून मारहाण; सात जणांवर गुन्हा दाखल

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

भीमाशंकर (ता. खेड) येथील देवस्थान परिसरात सुरक्षा रक्षकांकडून एका शिक्षिकेसह त्यांच्या कुटुंबीयांना बेदम मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खेड पोलीस ठाण्यात सात सुरक्षा रक्षकांसह एका अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी माया हंबीर लंघे (वय ४८, रा. चंदननगर, पुणे) यांनी खेड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




फिर्यादीनुसार, २४ डिसेंबर रोजी दुपारी १.३० ते २ वाजण्याच्या सुमारास भीमाशंकर देवस्थानातील राम मंदिर परिसरात ही घटना घडली. देवस्थान आवारात सुरक्षा रक्षकांकडून भाविकांना धक्काबुक्की होत असल्याचे पाहून फिर्यादी माया लंघे यांनी याबाबत विचारणा केली. याचा राग आल्याने सुरक्षा रक्षकांनी माया लंघे, त्यांचे पती हंबीर लंघे आणि मुलगा राजवर्धन यांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.तसेच शिवीगाळ करून फिर्यादींचा मोबाईल फोन जमिनीवर आपटून फोडण्यात आला, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणातील आरोपींमध्ये निळा शर्ट व काळे जॅकेट परिधान केलेली, कानात बाळी घातलेली एक व्यक्ती, तसेच चार पुरुष सुरक्षा रक्षक आणि तीन महिला सुरक्षा रक्षक यांचा समावेश आहे. मात्र, आरोपींची संपूर्ण नावे व इतर तपशील अद्याप स्पष्ट झालेले नाहीत. घटनेच्या वेळी देवस्थान परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होती. खेड पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, संबंधित आरोपींचा शोध सुरू आहे. लवकरच आरोपींना अटक करण्यात येईल, असे खेड पोलिसांनी सांगितले आहे.

# भीमाशंकर मंदिर ३ महिन्यांसाठी बंद

**पुणे । प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असेलेले भीमाशंकर मंदिर काही दिवसांसाठी बंद राहणार आहे. भीमाशंकर मंदिरातील सभामंडप व पायरी मार्गाच्या बांधकाम तसेच भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने मंदिर ९ जानेवारी २०२६ पासून पुढील ३ महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्यात येणार आहे.




श्री क्षेत्र भिमाशंकर संस्थानने हा निर्णय घेतला आहे. याकरिता भाविकांना सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे. मात्र भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदीर भाविकांकरिता दर्शनाकरिता खुले राहणार आहे. राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वांच्या सहमतीने मंदिर ९ जानेवारीपासून पुढे तीन महिन्यासाठी (महाशिवरात्रीचा १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ हा कालावधी वगळून) तात्पुरते बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांकडून श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे. मंदिर दर्शनासाठी बंद असले तरी श्री भीमाशंकर यांची नित्य पूजाअर्चा, अभिषेक व धार्मिक विधी परंपरेनुसार व नियोजित वेळेत सुरू राहतील. थेट दर्शन बंद या कालावधीत भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश अथवा प्रत्यक्ष दर्शन सेवा उपलब्ध राहणार नाही. बांधकाम यंत्रणा, अधिकृत अधिकारी कर्मचारी तसेच भीमाशंकर ग्रामस्थ वगळता कोणालाही श्री क्षेत्र भीमाशंकर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही.

# तुरुंगातून थेट निवडणूक रिंगणात! बंडू आंदेकरचा अर्ज, व्हिक्ट्री साईनने शक्तीप्रदर्शन

**पुणे । प्रतिनिधी**

आतापर्यंत उत्तर प्रदेश-बिहारमध्ये पाहायला मिळणारे चित्र आता शिक्षणाचं माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातही दिसून आलं आहे. आयुष कोमकर हत्या प्रकरणातील आरोपी आणि आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर याने थेट तुरुंगातून महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करत लोकशाहीचाच बाजार मांडला. तोंडावर काळं कापड, पोलिसांच्या दोरखंडात जखडलेला आणि कडक बंदोबस्तात आणलेला बंडू आंदेकर भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात अर्ज भरताना व्हिक्ट्री साईन दाखवत शक्तीप्रदर्शन करताना दिसून आला.

'नेकी का काम, आंदेकर का नाम' अशा घोषणांसह त्याने अर्ज भरण्याची एन्ट्री घेतली आणि अर्ज दाखल करतानाच स्वतःच्या प्रचाराचा नारळ फोडला. शनिवारी पोलिस बंदोबस्तात भवानी पेठ




कार्यालयात आणण्यात आलेल्या आंदेकरने, बघा बघा, मला लोकशाहीत कसं आणलंय. आंदेकरांना मत म्हणजे विकासकामांना मत. मी उमेदवार आहे, दरोडेखोर नाही. वनराज आंदेकर जिंदाबाद, अशा घोषणा देत वातावरण तापवलं. सध्या आयुष कोमकर हत्या प्रकरणात तुरुंगात असलेला बंडू आंदेकर पुण्यातील प्रभाग क्रमांक २३ मधून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवण्यात इच्छुक आहे. महापालिका निवडणुकीसाठी आंदेकर कुटुंबातील तिघांना विशेष न्यायालयाने सशर्त परवानगी दिली आहे. बंडू आंदेकर, लक्ष्मी उदयकांत आंदेकर, सोनाली वनराज आंदेकर यांना परवानगी दिली गेली आहे. मात्र न्यायालयाने बंडू आंदेकरला मिरवणूक, भाषण आणि घोषणाबाजी करण्यास स्पष्ट मनाई केली होती. तरीही प्रत्यक्षात घोषणाबाजी आणि शक्तीप्रदर्शन पाहायला मिळाले. लक्ष्मी आंदेकर आणि सोनाली आंदेकर या दोघीही ५ कोटी ४० लाख रुपयांच्या खंडणी प्रकरणात सध्या कारागृहात आहेत. आंदेकर कुटुंबातील हे तिघेही प्रभाग क्रमांक २२, २३ आणि २४ मधून निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याची माहिती आहे. बंडू आंदेकरला खंडणीच्या गुन्ह्यात कारागृहातून गुन्हेशाखेने पोलीस कोठडीत घेतले आहे. तो सध्या गुन्हे शाखा युनिट एकच्या ताब्यात आहे. तर लक्ष्मी आणि सोनाली आंदेकर या कोल्हापूर कारागृहात आहेत. त्यांना तेथून सकाळी साडे नऊला पुणे शहरात आणण्यात आले. तीघांनाही साडे अकराच्या सुमारास क्षेत्रीय कार्यालयात आणण्यात आले. ते दुपारी तीन वाजता बाहेर पडले.

तो पर्यंत परिसरात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पोलीस उपायुक्त, सहायक आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि गुन्हे शाखेची पथके तैनात करण्यात आली होती. परिसरात बॅरिकेटस लावून सर्वसामान्य नागरिकांना बंदी घालण्यात आली होती. यामुळे आंदेकर टोळीचे नंबरकारी तीकडे फिरकलेच नाहीत.

# गौतम अदानींच्या हस्ते होणार देशातील सर्वात मोठ्या 'एआय' केंद्राचं उद्घाटन

**बारामती । प्रतिनिधी**

देशातील सर्वात अत्याधुनिक व ग्रामीण जीवनाचा चेहरामोहरा बदलू शकणा-या विद्या प्रतिष्ठानच्या शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे उद्धाटन रविवारी (दि. २८) रोजी होत आहे. अदानी उद्योगसमूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या हस्ते, ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे,खासदार सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत सकाळी दहा वाजता गदिमा सभागृहात हे उदघाटन होणार आहे.



विद्या प्रतिष्ठाणचे उपाध्यक्ष अँड. ए. व्ही. प्रभुणे, खजिनदार युगेंद्र पवार, सचिव अँड. नीलिमा गुजर यांनी या बाबत माहिती दिली. बदलत्या काळाची पावले ओळखत आर्टिफिशियल इंटेलिजेन्सचे शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे या उद्देशाने शरद पवार यांच्या पुढाकारातून बारामतीत हे केंद्र सुरु होत आहे. या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये अत्याधुनिक एआय व डेटा सायन्स प्रयोगशाळा, प्रमाणपत्र व कौशल्यवर्धक अभ्यासक्रम, उद्योगतज्ज्ञांचे मार्गदर्शन, संशोधन व नवउद्योजकतेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स (-ख) हे केंद्र कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, डेटा सायन्स, व्यवसाय विश्लेषण व नवोन्मेष या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांना, संशोधकांना व उद्योगजगताला एकत्र आणणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.

# हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील प्राध्यापक बेपत्ता; दुसऱ्या दिवशी धक्कादायक उलगडा

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागात सायन्स (जीवशास्त्र) विषयाचे प्राध्यापक डॉ. भानुदास मोतीलाल परदेशी (वय ५२) यांचे निधन झाल्याचा दुर्दैवी प्रकार समोर आला आहे.खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात गेली २३ वर्षे अध्यापन करणारे प्रा. डॉ. परदेशी हे शांत, संयमी, सुस्वभावी व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून परिचित होते.

मात्र गुरुवारी (दि. २५) खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील शिरगाव-तळेघर रस्त्यावरील मंदोशी गावाजवळ, भैरवनाथ मंदिर परिसरातील एका विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आल्याने सर्वांनाच धक्का बसला. मिळालेल्या माहितीनुसार, प्रा. परदेशी हे बुधवारी (दि. २४) दुपारी सुमारे ३ वाजता महाविद्यालयातील अध्यापनाचे काम आटोपून मोशी येथे जाण्यासाठी मोटारसायकलवरून निघाले होते. मात्र ते घरी न पोहोचल्याने सायंकाळी सुमारे ८ वाजता त्यांच्या पत्नीने सहकारी शिक्षकांकडे चौकशी केली. त्यानंतर शिक्षकांनी एकत्र येऊन शोधमोहीम सुरू केली. वाकी येथील एका हॉटेलमध्ये चहा घेतानाचे सीसीटीव्ही फुटेज आढळून आले. मोबाईल बंद असल्याने अपघाताची शक्यता लक्षात घेऊन विविध रुग्णालयांत चौकशी करण्यात आली. अखेर रात्री १. ३० वाजता खेड पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल करण्यात आली. दरम्यान, मंदोशी येथील भैरवनाथ मंदिर परिसरात सायंकाळी मोटारसायकल, बॅग व चपला आढळून आल्याने पुजाऱ्यांनी पोलिस पाटील व ग्रामस्थांना माहिती दिली. मोटारसायकल क्रमांकाच्या आधारे चाकण पोलिसांनी खेड पोलिसांशी संपर्क साधला. माहिती जुळल्यानंतर कुटुंबीय व सहकारी शिक्षकांना कळविण्यात आले. स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने विहिरीत शोध घेतल्यानंतर रात्री सुमारे १२ वाजता मृतदेह हाती लागला. त्यानंतर शुक्रवारी सकाळी चांडोली ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. खेड पोलिसांनी घटनास्थळावरून बॅग व मोबाईल ताब्यात घेतला असून, मृत्यूच्या कारणाबाबत सखोल तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# मंचरच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध; नगराध्यक्षा राजश्री गांजाळे यांची ग्वाही

**मंचर । प्रतिनिधी**

मंचर शहराच्या विकासाकरिता आम्ही नगरसेवक कटिबद्ध राहू.शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील.अशी ग्वाही नगराध्यक्षा राजश्री गांजाळे यांनी दिली.मंचर (ता.आंबेगाव) येथील धर्मवीर संभाजी नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सन २०२६ ची दिनदर्शिका प्रकाशन व मंचर नगरपंचायत नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार सोहळा संस्थेचे अध्यक्ष सीताराम लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.



कार्यक्रमप्रसंगी नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा राजश्री गांजाळे, नगरसेवक वंदना बाणखेले,उर्मिला प्रवीण मोरडे, वसंतराव बाणखेले,विकास जाधव, डॉ.सोनाली विकास बाणखेले, धनेश मोरडे, अंजली बाणखेले, संदीप थोरात, रविकिरण आवळे, शिवाजी राजगुरू, इम्रानअली मीर, अंशरा शेख, मालती थोरात,माणिक गावडे, पल्लवी गांजाळे, बेबी थोरात इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थित त्यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.प्रास्ताविकात संस्थेचे उपाध्यक्ष मंगेश बाणखेले यांनी संस्थेच्या ठेवी ७५ कोटी रुपये, तसेच पतसंस्थेच्या प्रगतीची माहिती दिली. कार्यक्रमास संचालक पुरुषोत्तम पोकार, सुदाम बेंडे, दिलीप महाजन, शांताराम बाणखेले, मनीष ठक्कर, बाबाजी इंदोरे, पप्पुशेठ थोरात, अश्विनी शेटे, अनिता निघोट, अजेस भोंडवे व जितेंद्र सोनवणे व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शेवाळे आदी मान्यवर उपस्थित होते.आभार अश्विनी शेटे यांनी मानले.